रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३५०
www.ramprahar.com

रविवार, ७ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

गुरेचोर टोळी सक्रिय; पोलीस गस्त वाढवण्याची मागणी/२
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
हार्दिक पांड्यासाठी भाऊ कृणालची भावूक पोस्ट/८

## केंद्र सरकारचा अर्थसंकल्प २३ जुलैला होणार सादर



**नवी दिल्ली** : संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरू होणार असून २३ जुलैला अर्थसंकल्प मांडला जाणार आहे तसेच १२ ऑगस्ट रोजी अर्थसंकल्पाचा शेवट होईल, अशी माहिती केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी (दि. ६) दिली. १८व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन नुकतेच झाले. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, राष्ट्रपतींचे अभिभाषण आणि त्यावरील चर्चा पार पडली. त्यानंतर अधिवेशनाला विराम देण्यात आला होता. आता पुन्हा २२ जुलैपासून अधिवेशन सुरू होईल. अर्थमंत्री निर्मला सीतारामन एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील अर्थसंकल्पही त्याच सादर करणार आहेत. सलग सातवेळा केंद्रीय अर्थमंत्री म्हणून अर्थसंकल्प मांडणाऱ्या त्या पहिल्याच व्यक्ती ठरणार आहेत.

# महायुतीने विधानसभेचे रणशिंग फुंकले

### मुंबईत पदाधिकाऱ्यांचा मेळावा उत्साहात



**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीनंतर आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी महायुतीने सुरू केली असून घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा शनिवारी (दि.६) मुंबईतील षण्मुखानंद हॉलमध्ये मोठ्या उत्साहात झाला.

या मेळाव्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, मंत्री, महायुतीमधील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या भ्रष्टाचाराचा समाचार घेताना मुख्यमंत्री शिंदे यांनी, तुम्ही डोक्यावर पडलाय का? बोफोर्सपासून शेणापर्यंत तुम्ही सगळे पैसे खाल्लेत. तुम्हाला बोलण्याचा अधिकार आहे का, असा घणाघात केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांना एकत्रितपणे काम करण्याच्या सूचना केल्या. फेक नरेटीव्ह पसरवणाऱ्यांच्या ट्रॅकमध्ये आपण अडकायचे नाही, असे सांगून आगामी विधानसभा निवडणुकीत २०० जागा जिंकू, असा विश्वासही व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीमध्ये समन्वय राखण्यासाठी कामाला लागूया, असे म्हटले. या वेळी इतरही प्रमुख नेत्यांनी मार्गदर्शन केले.

# गरजेपोटी बांधलेली घरे, पिण्याचे पाणी, नैना, पायाभूत सुविधांसंदर्भात योग्य नियोजन व्हावे

### आमदार प्रशांत ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गरजेपोटी बांधलेली घरे, पिण्याचे पाणी, नैना क्षेत्रातील प्रश्न, पायाभूत सुविधा योग्य नियोजन या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळात अर्थसंकल्पातील नगरविकास विभागाच्या मागणी अनुषंगाने शासनाकडे मागण्या मांडल्या. या वेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना मुख्यमंत्री महोदयांनी याकडे विशेषत्वाने लक्ष देण्याची मागणी केली.




आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहातील आपल्या भाषणात म्हटले की, नगरविकास विभागाच्या अंतर्गत येणारा नवी मुंबई, ठाणे जिल्हा, पनवेल तालुका, उरण तालुका हा परिसर मिळून सिडकोची नवी मुंबई निर्माण झाली. १९७० साली सिडकोची स्थापना झाली आणि त्या वेळेला असेलल्या गावठाणाच्या सीमारेषा कागदावर कायम केल्या गेल्या. १९७०नंतर सिडकोची कामे क्रमाक्रमाने अजूनही होत आहेत, मात्र गावठाणाच्या सीमारेषा १९७० सालच्याच पकडल्या जातात आणि यामुळे त्या गावठाणाच्या पलीकडे बांधलेल्या घरांच्या बाबतीतला प्रश्न आजही प्रलंबित आहे. या जमिनीवरील घरे नियमित करावीत यासाठी लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांनीसुद्धा संघर्ष केला आहे. या ठिकाणी वारंवार झालेल्या संघर्षामुळे कधी २०० ते कधी २५० मीटरची मर्यादा घातली गेली आहे, पण २५० मीटरची मर्यादासुद्धा अव्यवहार्य आहे आणि ते वारंवार लक्षात आले आहे. मधल्या काळात क्लस्टरचा पर्याय आला, पण क्लस्टरचा पर्यायसुद्धा लोकांना पूर्णपणे स्वीकारार्ह नाही. अशा वेळेला क्लस्टर असावे की गावठाण असावे या वादात कोणताही निर्णय झाला नाही.

पनवेल महानगरपालिका झालेली आहे. अन्य ग्रामपंचायतीही आहेत, पण गावठाणाभोवतालच्या बांधकामावर लोकं आपली घरे पुनर्बांधणी करायला जातात, मात्र पुनर्बांधणी करायला सिडको त्यांना परवानगी देत नाही आणि त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होते. अशा वेळेला सतत संघर्षाची भूमिका ग्रामस्थांकडून घेतली जाते आणि त्यामुळे सरकारच्या विषयी लोकांच्या मनात आकस निर्माण होतो. त्या अनुषंगाने या बाबतीत मुख्यमंत्री महोदयांनी लवकरात लवकर शासन पातळीवर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. स्व. दि.बा. पाटीलसाहेबांनी केवळ घरे नाही तर गरजेपोटी झालेल्या सर्व घरांना नियमित करण्याची गरज व्यक्त केली होती. घरे असू द्या किंवा व्यावसायिक बांधकाम असू द्या योग्य व्यवहाराप्रमाणे प्रीमियम घ्या, पण या गरजेपोटी घरांच्या बाबतीतला निर्णय सरकारने घेण्याची आवश्यकता आहे. गावांच्या बाबतीतल्या ज्या नागरी सुविधा आहे त्या देण्यात सिडको आजही टाळाटाळ करते. सिडको विकसित करणाऱ्या शहरांसाठी सुविधा मिळतात, पण गावांना सुविधा मिळत नाही हा भेदभाव दूर करण्याची गरज आहे. आज सीआरझेडमुळे अनेक ठिकाणी स्मशानभूमीपासून मैदानापर्यंत अनेक सोयीसुविधांवर निकष. बंधने आली आहेत, पण सिडको स्वतःसाठी आवश्यक त्या ठिकाणी सीआरझेडच्या निकषासाठी भांडणार आणि स्वतःला हवी ती बांधकामे करून घेणार, मात्र गावांसाठीच्या सुविधांकडे मात्र कानाडोळा करणार हे योग्य नाही याकडे आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष वेधले.

नैना शहर सिडकोने बांधायचे ठरवले. प्रथम नैना स्कीम करायची ठरवली. आता टिपी स्कीम करण्याचे ठरले, पण यामध्ये टीपी स्कीमचा विकास सिडको करणार आणि त्यासाठी हजारो कोटी रुपये मोजायला सिडको तयार होत आहे, पण गावठाण की ज्याच्याभोवती ज्यांच्या जागांवर नैना टीपी स्कीम घेणार आहेत तेथील गटारे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था काय आहे? सिडको हद्दीतील वसाहतींना पिण्याचे पाणी मिळत नाही. मग कोंढाणे धरण होत नसेल बाळगंगा अपूर्ण असेल तर पाणी कशा प्रकारे दिले जाणार आहे. नैना हद्दीतील उसर्ली, विचुंबे, देवद, पाली देवद, आकुर्ली, कोळखे, पळस्पे अशी २३ गावे आहेत. या गावातील गावठाणाच्या सोयीसुविधांचा विकास झाला पाहिजे. नैनाच्या हद्दीतील बांधकामावर सिडकोचे अधिकारी कारवाई करीत आहेत. त्यामुळे लोकांच्या मनात असंतोष आहे. सिडकोच्या हद्दीतील शहरातील पाणी वितरण व्यवस्थेत त्रुटी आहेत. आजही शहरांना पाणी मॅन्युअली दिले जाते, ते ऑटोमेशन झाले पाहिजे. पाणी वितरणासंदर्भात सिडकोने टाटा कन्सल्टन्सीची नेमणूक केली होती, पण त्यांच्या अहवालावर अंमलबजावणी मात्र केली जात नाही. या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करूनही उपाययोजना होत नाही. म्हणून कामोठे, कळंबोली, खारघर, तळोजा या प्रत्येक ठिकाणी मोर्चे निघत आहेत, रोज अधिकाऱ्यांना घेराव घातला जात आहे. त्यामुळे पाण्याचे वितरण नियोजन योग्य प्रकारे होण्यासाठी योग्य मार्ग काढण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात सिडकोला निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. (पान २ वर..)

# कोयना प्रकल्पग्रस्तांच्या आशा पल्लवित

### आज पनवेलमध्ये बैठक



**चौक : प्रतिनिधी**

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या नुकत्याच मुंबई आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनाची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिमंडळ कक्षात बैठक घेतली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाच्या प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करून प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न लवकर मार्गी लावण्याचे आदेश दिले. त्यामुळे या प्रकल्पग्रस्तांच्या ६४ वर्षानंतर आशा पल्लवित झाल्या आहेत. या संदर्भात संघाची बैठक रविवारी (दि. ७) पनवेल तालुक्यातील धानसर येथे होणार आहे.

सातारा जिल्ह्यातील कोयना जल विद्युत प्रकल्पामुळे १०५ गावांचे स्थलांतर १९५९ साली रायगड, ठाणे, सातारा, रत्नागिरी, सांगली, पालघर जिल्ह्यात झाले. त्या वेळी पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता. तत्कालीन नेत्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून प्रकल्पग्रस्त जनतेने स्वखर्चाने जमिनी घेऊन वसाहती स्थापन केल्या, मात्र आजतागायत ते पर्यायी जमीन, नागरी सुविधा, नोकरी, प्रकल्पग्रस्त दाखले, बेरोजगार भत्ता या पासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाच्या माध्यमातून राज्यातील सात जिल्ह्यातून २० तालुक्यात एकदिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले.

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेने पुकारलेले एकदिवसीय ठिय्या आंदोलन यशस्वी झाल्याने कोकणभवन ते विधान भवन लाँग मार्च काढण्याचा इशारा देण्यात आला होता, परंतु आचारसंहितामुळे या लाँग मार्चला पोलिसांनी परवानगी नाकारली. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन केले. (पान २ वर..)

## रीलच्या नादात तरुणाचा मृत्यू

**बीड : प्रतिनिधी**

सध्या सेल्फिचा ट्रेण्ड आहे, पण हाच नाद कधीकधी जीवघेणा ठरू शकतो याची प्रचिती बीडमधील धक्कादायक घटनेतून आली आहे. येथे दुकाचीकवरून प्रवास करीत असताना सेल्फी काढण्याचा प्रयत्न केल्यामुळे एकाचा जागीच मृत्यू झाला असून अन्य एक जण गंभीर जखमी आहे.

या घटनेच्या व्हिडीओत दुचाकीवर मागे बसलेला तरुण सेल्फी कॅमेऱ्याच्या माध्यमातून रिल काढत होता. विशेष म्हणजे बाईक चालवत असलेला तरुणदेखील रिल तयार करण्यासाठी फोनमध्ये बघण्याचा प्रयत्न करीत असताना त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. यात एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. दोघेही तरुण जालन्याचे रहिवासी आहेत.

## निवडक

### पोलीस भरतीदरम्यान आणखी एका युवकाचा मृत्यू

**पुणे** : येथे सुरू असलेल्या पोलीस भरतीदरम्यान संगमनेर तालुक्यातील कोठे गावचा रहिवासी असलेल्या तुषार भालके या २७ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. चाचणीत धावत असताना तुषार भालके याला अचानक चक्कर आली आणि तो जमिनीवर पडला. त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारदरम्यान मृत्यू झाला. पोलीस भरतीदरम्यान युवकाचा दुर्दैवी अंत होण्याची राज्यातील ही तिसरी घटना आहे.

### संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत स्नान

**सातारा** : ज्ञानोबा-माऊलीच्या जयघोषात लोणंद येथे नीरा नदीच्या घाटावर ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांना शनिवारी (दि. ६) शाही स्नान घालण्यात आले. या वेळी हजारो संख्येने वारकऱ्यांनी गर्दी केली होती. यंदा नीरा स्नानावेळी वरुणराजानेसुद्धा हजेरी लावली. त्यामुळे सोहळ्याची शान आणखी वाढली. यानंतर भक्तिमय वातावरणात सातारा जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे स्वागत झाले.

# कोकणात सहकारी संस्था वाढल्या पाहिजेत -प्रवीण दरेकर



**अलिबाग : प्रतिनिधी**

सहकारात फार मोठी ताकद आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये सहकार क्षेत्राचा वाटा आहे. महाराष्ट्रात जे छोटे उद्योग आहेत त्यांना सहकारी संस्थांनीच मदत केली आहे. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे कोकणाचा विकास करायचा असेल तर येथे सहकारी संस्था वाढल्या पाहिजेत, असे मत मुंबै बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे शनिवारी (दि. ६) अलिबाग येथील हॉटेल बिगफ्लॅश येथे कर्मचारी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, उपाध्यक्ष मोरेश्वर दातार, सचिव लक्ष्मण जुंधारे, संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे, भाजप अलिबाग तालुका अध्यक्ष उदय काठे, दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस परशुराम म्हात्रे, सतिश लेले आदी उपस्थित होते.

कोकणाचा विकास करायचा असेल तर कोकणात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण व्हायला हवे. त्यासाठी कमळ पतसंस्थेने आता पुढाकार घ्यायला हवा. त्यांनी कोकणात शाखा सुरु करव्यात. कमळ पतसंस्था कोकणच्या विकासाचा केंद्रबिंदू ठरली पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील पतसंस्थांनी मुंबईत येऊन प्रगती केली. त्याप्रमाणे कमळ पतसंस्थेनेदेखील मुंबईत येऊन आपली अधिक प्रगती करावी. त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य मी करेन, असे आश्वासन आमदार प्रवीण दरेकर यांनी या वेळी दिले. (पान २ वर..)



**पनवेल** : थोर राष्ट्रीय नेते, शिक्षणतज्ज्ञ, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात शनिवारी साजरी करण्यात आली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच व युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, ज्येष्ठ नेते आनंद म्हस्कर, विश्वास काथारा, शिरवली ग्रामपंचायत माजी सरपंच तुकाराम पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विनम्र अभिवादन केले.

## रोह्यात रिव्हर राफ्टिंगदरम्यान पर्यटकाचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील कोलाड येथे रिव्हर राफ्टिंगदरम्यान वांद्रे (मुंबई) येथील एका पर्यटकाचा शनिवारी (दि. ६) अचानक मृत्यू झाला. या मृत्यूमागे प्रथमदर्शनी हृदयविकाराचे कारण असल्याचे बोलले जात आहे.

अभिजित श्रीकांत कुलकर्णी (वय ४९) असे या पर्यटकाचे नाव असून ते वांद्रे प्रकाशगड येथील विद्युत महानिर्मिती केंद्रात मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अभिजित कुलकर्णी कुटुंबासह कोलाड येथे आले. या वेळी त्यांनी रिव्हर राफ्टिंग केले. तराफ्यात पाण्याच्या लाटांवरून ते कामथ येथे पोहचले. तिथे थांबल्यानंतर सर्वजण तराफ्यातून उतरले. या वेळी अभिजित हे अचानक जमिनीवर पडले. कुटुंबीयांनी व इतरांनी त्यांना रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतर या पर्यटकाच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परिषदेच्या शिष्यवृत्ती परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले. याबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. यामध्ये इयत्ता आठवीतील कार्तिक साईनाथ दहिफळे, सुकन्या रवीकिरण पायघन, रविराज महेश भोसले, यश रामचंद्र शिंगाडे, दुर्वेश सूर्यकांत मोरे व सर्वेश मधुकर देसाई, तर पाचवीतील वेदांत कृष्णा कडू, राहुल सत्यवान बांगर, मयुरेश संतोष माने व स्वरा सुनील पाटील यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले. या वेळी इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, हेड क्लर्क प्रियांका बांगर, पब्लिक स्कूल (सीबीएसई बोर्ड)चे प्राचार्य अविनाश कुलकर्णी उपस्थित होते.

दरम्यान, विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर तसेच पर्यवेक्षिका कुसुम प्रजापती, सारिका लांजुडकर, नेहा खन्ना तसेच शिक्षकवृंदानेही या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भाजप नेते राजेंद्र पाटील यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून जनता विद्यालयास पाच लाखांची मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांचा सुवर्ण महोत्सवी (५०वा) वाढदिवस अजिवली येथील जनता विद्यालयात विद्यार्थी सत्कार, वह्या वाटपासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शनिवारी (दि. ६) साजरा करण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या वेळी त्यांनी जनता विद्यालयाच्या विकासासाठी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. दरम्यान, वाढदिवसानिमित्त वारदोली येथील विश्वधर्म वारकरी शिक्षण संस्थेच्या मुलांना धान्याचे वाटप आणि वारदोली गावात वृक्षारोपणही करण्यात आले.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तसेच जनता विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन असलेले राजेंद्र पाटील यांनी ५०व्या वर्षात पदार्पण केले आहे. यानिमित्त दरवर्षीप्रमाणे त्यांचा वाढदिवस विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून साजरा झाला. या वाढदिवसाचे औचित्य साधून अजिवली येथील जनता माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये दहावी आणि बारावीच्या परीक्षेत सुयश प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, जनता विद्यालय तसेच कन्या प्रशालेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप, गरीब आणि गरजू मुला-मुलींना शालोपयोगी साहित्याचे वाटप, पळस्पे जिल्हा परिषद विभागातील आशा वर्करसचा सत्कार, अंगणवाडी शिक्षिका आणि मदतनीसांचा सत्कार तसेच त्यांना छत्री वाटप आणि घंटागाडी कामगारांना छत्री वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. (पान २ वर..)

# काँग्रेसमध्ये अंतर्गत नाराजी

## खासदारांच्या सत्कारावेळी प्रतिभा धानोरकरांची दांडी



**चंद्रपूर : प्रतिनिधी**

विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील नवनिर्वाचित काँग्रेस खासदारांच्या सत्कार कार्यक्रम शनिवारी (दि. ६) आयोजित करण्यात आला होता, मात्र या कार्यक्रमाला चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दांडी आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद उफाळला आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सावली तालुक्यातील व्याहाड-खुर्द या गावी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने लोकसभा निवडणुकीनंतर चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर आणि गडचिरोलीचे खासदार नामदेव किरसान यांच्यासह वडेट्टीवार एकाच मंचावर येण्याची प्रतीक्षा होती. लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान वडेट्टीवार आणि धानोरकर यांच्यात तिकिटाच्या मुद्द्यावरून झालेला संघर्ष ताजा असताना या सत्कार कार्यक्रमाला राजकीय महत्त्व होते, मात्र केवळ खासदार किरसान यांची वडेट्टीवार यांच्यासह हजेरी, खासदार प्रतिभा धानोरकर चंद्रपूर मुख्यालयी कार्यालयात शनिवारी हजर होत्या, मात्र त्यांनी वडेट्टीवार यांच्यासह एका मंचावर येणे टाळले.

महाविकास आघाडीत काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या जागेवरूनदेखील रस्सीखेच पाहायला मिळाली होती. शेवटी दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती, मात्र चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून विजय वडेट्टीवारांची कन्या शिवानी वडेट्टीवारदेखील इच्छुक होत्या. लेकीच्या उमेदवारीसाठी वडेट्टीवारांनी प्रतिष्ठा पणाला लावली होती.

# पनवेलमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात

### ✻ महापालिका कार्यक्षेत्रात विशेष शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयअन्वये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. पनवेल महापालिकेच्या वतीने या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्षेत्रात पाच ठिकाणी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त पात्र भगिनींनी या योजनेचा लाभ, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लाभार्थी भगिनींनी सदर योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने महिला बालकल्याण विभागातर्फे पाच प्रभाग समिती निहाय विशेष शिबिर अथवा कॅम्पचे नियोजन करण्यात आले आहे. हे विशेष शिबिर ८, ९, १० जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते ६ या वेळात घेतले जाणार आहेत. तसेच ११ जुलैपासून ३१ ऑगस्टपर्यंत प्रत्येक प्रभाग कार्यालयात या योजनेंतर्गत अर्ज भरण्यात येणार नाही.

आजपासून प्रत्येक प्रभाग समितीमध्ये अंगणवाडी सेविका, महापालिकेचे कर्मचारी तसेच आरोग्य विभागामार्फत परिचारक असे एकुण १५० मदतनीस कार्यरत असणार आहेत. तसेच प्रत्येक प्रभाग समिती निहाय पाच ऑटो रिक्षाद्वारे योजनेसाठी लागणारी कागदपत्रे तसेच शिबिराची प्रसिद्धी करण्यात येत आहे.

आयुक्तांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धसाठी शहरातील विविध ठिकाणी होर्डिंग्ज व १०० ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले आहेत. याचबरोबर दहा हजार पॅम्प्लेट्सचे वाटप करण्यात येत आहे तसेच पथनाट्याद्वारेही प्रत्येक प्रभाग समितीमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

**पाच ठिकाणी विशेष शिबिरे ८, ९ , १० जुलै रोजी सकाळी १० ते ६ या वेळात घेतली जाणार आहेत.**

**पनवेल** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन आणि रोहिदास वाडा समाज मंदिर

**खारघर** – खारघर प्रभाग समितीमध्ये टॅक्स ऑफिस, प्राईड सोसायटी (सेक्टर ७) कळंबोली प्रभाग समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (रोडपाली)

**कामोठे**– प्रभाग समितीमध्ये कम्युनिटी हॉल, सेक्टर २१

**नावडे**– नावडे उपविभागामध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र फेज २

**प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या सक्षम बँक खात्यात डीबीटीद्वारे दरमहा १५०० रुपये इतकी रक्कम दिली जाईल.**

**योजनेचे लाभार्थी**

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

**पात्रता**

१. महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक.
२. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.
३. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत.
४. लाभार्थ्यांचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असणे आवश्यक.
५. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

# खालापूरात गुरे चोरणारी टोळी सक्रिय; पोलीस गस्त वाढवण्याची मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

गुरे चोरणाऱ्या टोळीला पोलिसांचे भय उरले नसून खालापूर हद्दीत दिवसा चारचाकीतून गुरे चोरून नेण्याचा प्रकार घडला आहे. कत्तलीसाठी गुरे चोरणारी टोळी खालापूर, कर्जतसह रायगडात फिरत आहे. संशय येऊ नये म्हणून चारचाकी महागड्या पॉश गाड्यांचा वापर चोरटे करत आहेत.

सध्या सर्वत्र हिरवा चारा मुबलक प्रमाणात असल्याने गुरांचे कळप चाऱ्यासाठी फिरताना दिसत असून, त्याचा फायदा गुरे चोरणाऱ्या टोळीने उचलला आहे. खालापुरातील सावरोली खारपाडा राज्य मार्गावर माडप पुलावर दररोज बसणाऱ्या गुरांच्या कळपावर या चोरट्यांची नजर पडली असून दोन दिवसांपूर्वी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास इनोव्हा गाडीत कोंबून गुरे चोरण्यात आली. काही गोरक्षक आणि याबाबत तातडीने पोलिसांना माहिती दिली, परंतु योग्य नाकाबंदी अभावामुळे गुरे चोरणारी टोळी पसार झाली.

महामार्गावर, राज्य मार्गावर खालापूर हद्दीत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या पोलीस चौकी सध्या बंद असल्याने चोरट्यांना धाक उरलेला नाही. चौक फाटा, दांड फाटा, सावरोली चार फाटा या ठिकाणी पोलीस चौकी बंद असल्याने योग्य प्रकारे नाकाबंदी होत नाही. गुरे चोरणारी टोळी तयारीने असल्याने सर्वसामान्य त्यांचा पाठलाग करताना जीवाची भीती आहे. पोलिसांनी ॲक्शन मोडमध्ये येणे आवश्यक आहे.

# ऐरोली विभागात ठाकरे गटाला धक्का

### मनोज हळदणकर यांचा शिवसेनेत प्रवेश

**नवी मुंबई :** येथील ऐरोली विभागातील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक मनोज हळदणकर यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. मुख्यमंत्री आणि पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पक्षप्रवेश झाला. या वेळी खासदार नरेश म्हस्के उपस्थित होते.

शिवसेनेचे नवी मुंबई महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांच्या पुढाकाराने हा पक्षप्रवेश करण्यात आला. हळदणकर यांचा पक्षप्रवेश म्हणजे नवी मुंबईत उबाठा गटाला मोठा धक्का मानला जात आहे.



# महायुती सरकारमध्ये आरोग्यसेवा अधिक सक्षम होईल –मंत्री तटकरे



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेवा आणि सिटीस्कॅन सेंटरचे उद्घाटन शनिवारी (दि. ६) महिला व बाल विकास मंत्री ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते पार पडले. महायुती सरकारमध्ये आरोग्य सेवा अधिकाधिक सक्षम होईल, असे प्रतिपादन या वेळी ना. आदिती तटकरे यांनी केले.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर, जिल्हा चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, शिसवेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माजी नगराध्यक्ष आनंद यादव महिला जिल्हाप्रमुख नीलिमा घोसाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, क्रिश्ना डायग्नोस्टीक्स कार्यकारी संचालक पल्लवी जैन, वैद्यकीय अधीक्षक अरुणा पोहरे, रा. कॉ. युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, जेष्ठ समाजसेवक संजय अण्णा साबळे, सुमित काळे, शिवसेना शहरप्रमुख सुनील पवार, मयूर शेठ, उपजिल्हा रुग्णालय डॉक्टर, कर्मचारी आदी उपस्थित होते.

या वेळी ना. तटकरे पुढे म्हणाल्या की, सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन व क्रस्ना डायग्नोस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे डायलिसिस व सिटी स्कॅन सेंटर सुरू झाले आहे. या रुग्णालयात या आरोग्य सेवा उपलब्ध करीत असल्याने रुग्णांना दिलासा मिळाला आहे. या सेवा शासनामार्फत मोफत देण्यात येणार आहेत. तसेच बाह्य रुग्णांना माफक दरात सवलती मध्ये देण्यात येणार आहे. त्यामुळे रुग्णांच्या पैशांची बचत होणार आहे. कोरोना काळात उपजिल्हा रुग्णालयात अनेक अत्याधुनिक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

माणगांव ही रायगड जिल्ह्याची उपराजधानी असून जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे लवकरच माणगांव येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याच्या दृष्टीने महायुती सरकार तर्फे प्रयत्न करण्यात येणार आहेत. रुग्णांना लागणाऱ्या सर्व सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहोत. अशा इतर आरोग्य सेवा यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ही सेवा सुरू होत असल्याने नागरीकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. डायलिसिस सेवा आणि सिटीस्कॅन सेंटर या सेवांचा अधिकाधिक रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माणगाव उपजिल्हा रुग्णालयातर्फे करण्यात आले आहे.

## पान १ वरून

### कोयना प्रकल्पग्रस्तांच्या आशा पल्लवित

याची तातडीने दखल घेण्यात आली आणि या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक आयोजित केल्याचे पत्र शिवसेना सचिव संजय मोरे यांनी आंदोलन ठिकाणी दिले. या बैठकीस मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, उत्पादन शुल्कमंत्री शंभूराजे देसाई, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना सचिव संजय मोरे यांच्यासह संबंधित खात्याचे सचिव, कोकण व पुणे आयुक्त व्हीसीद्वारे तसेच त्या त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस या सात जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त जनतेच्या मागण्यांसाठी आयएसआय दर्जाचा अधिकारी नेमावा तरच प्रश्न मार्गी लागतील, अशी भूमिका आमदार महेंद्र थोरवे यांनी घेतल्याने कोकण विभागीय आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. पाण्यात वरच्या भागात संपादित न झालेली जागा आम्हाला परत द्यावी या पवन कदम यांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि सातारा जिल्हाधिकाऱ्यांनी एकदा सर्व जिल्ह्यातील अखिल कोयना पुनर्वसाहतीच्या प्रतिनिधी यांची बैठक बोलवावी, असे सुचविले.

धरणाच्या पाणलोट क्षेत्राच्या वरच्या भागात व संपादित न केलेल्या जमिनींवर आमच्या नावे वारस पंचनामा करून वंशावळीनुसार नावे दाखल करण्याबाबत अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी सूचना केली. आमच्या जमिनी परस्पर व्याघ्र प्रकल्प आणि केंद्र सरकाराकडे वर्ग केल्या आहेत. ज्यांच्या जागा वर्ग केल्या त्यांना त्याची भरपाई देण्याबाबत चर्चा झाली. या वेळी कोयना प्रकल्पग्रस्तांना नोकरी देणे, बंद करण्यात आलेले दाखले पुन्हा देण्यात यावे आणि त्याच जिल्ह्यात ते वितरीत करावे, बेरोजगार भत्ता देणे, नागरी सुविधा, बेकारी भत्ता, देवस्थान इनाम जमीन व दिवाबत्ती यांचे पैसे मिळावे आणि मंदिर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. विस्तारित गावठाणासाठी जागा देणे, पोटखातेदार यांचा समावेश करण्यात यावा, अशा मागण्यांकडे लक्ष वेधण्यात आले. यावर सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीस कोयना पुनर्वसाहत सेवा संघाचे कार्याध्यक्ष अर्जुन कदम, सचिव एम.डी. चाळके, सल्लागार बळीराम शिंदे, पवन कदम, किसन जाधव, मारुती देवरे, आनंद मरागजे, उपाध्यक्ष अमोल कदम, आनंद सकपाळ, अंकुश मोरे, सुरेश सकपाळ, सदानंद भातोसे, सतीश जाधव आदी उपस्थित होते कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कोयनेच्या पुनर्वसन इतिहासात मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी दोन वेळा बैठक आयोजित केली. त्यामुळे प्रलंबित मागण्या पूर्ण होण्याची प्रकल्पग्रस्तांना आशा आहे.

### गरजेपोटी बांधलेली घरे, पिण्याचे पाणी, नैना, पायाभूत सुविधांसंदर्भात योग्य नियोजन व्हावे

पाण्याच्या बाबतीत वेगवेगळ्या महापालिकेत संघर्ष सुरू आहे. एमजीपी, एमआयडीसी, एनएमएमसी या पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणा आहेत. ठाणे जिल्ह्यात जशी स्टेम ऑथॉरिटी आहे तशी या सर्व यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यासाठी रायगडमध्ये ऑथॉरिटी आवश्यक आहे. विमानतळ होत असताना नैना शहर आहे या शहराला योग्य पद्धतीने पाणीपुरवठा व्हायचा असेल तर स्टेमसारखी ऑथॉरिटी झाली पाहिजे आणि ती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्या नेतृत्वाखाली झाली तर हा विषय निश्चित मार्गी लागू शकतो. त्यामुळे याचाही विचार या अनुषंगाने झाला पाहिजे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

### कोकणात सहकारी संस्था वाढल्या पाहिजेत –प्रवीण दरेकर

कोणत्याही सहकारी पतसंस्थेची प्रगती ही कर्मचाऱ्यांमुळे होते. संचालक मंडळ धोरण ठरवते, परंतु त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होणे आवश्यक असते. कर्मचारी धोरणांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने करतात तेव्हा पतसंस्थेची प्रगती होते. यासाठी कर्मचारी प्रशिक्षित असणे आवश्यक असते, असे आमदार प्रवीण दरेकर म्हणाले.

कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर माजी अध्यक्ष सतीश पाटील यांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.

### भाजप नेते राजेंद्र पाटील यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, भाजप अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पंचायत समितीचे माजी उपसभापती वसंत काठावले, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, भिंगार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच योगेश लहाने, सुकापूर ग्रामपंचायतीचे सदस्य महेश पाटील, कोन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विठ्ठल गाताडे, अमित पाटील, जनता विद्यालय स्कूल कमिटी सदस्य गोविंद पाटील, नाना भागीत, सामाजिक कार्यकर्ते सुरेश लाखांबले, आप्पा भागीत, सूर्यकांत पाटील, महेश मोकल, मुख्याध्यापक सुरेश ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त आपल्याला जो आनंद मिळालाय तो आनंद इतरांना कसा देता येईल या दृष्टिकोनातून राजेंद्र पाटील यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले तसेच त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी अनेक मान्यवरांनी पाटील यांचे अभीष्टचिंतन केले.

# न्हावे विद्यालयात शिक्षक पालक संघाची स्थापना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २४-२५ मधील विद्यार्थी-शिक्षक-पालक संघाची सभा झाली.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या या सभेस न्हावे ग्रामपंचायत सरपंच विजेंद्र पाटील यांचेसह स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य किसन पाटील, माजी सरपंच व स्थानिक शाळा समितीचे सदस्य हरिश्चंद्र पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी, शिक्षक आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल ह्या विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ही पहिलीच शिक्षक पालक सभा विद्यालयाचे चेअरमन श्री चंद्रकांत भोईर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेसाठी विद्यालयाला सदैव मदतीचा हात पुढे करणारे न्हावे गावचे विद्यमान सरपंच विजेंद्र पाटील, स्थानिक शाळा समितीचे सदस्य व माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य किसन पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांनी ह्या पालक सभेच्या प्रस्ताविकपर भाषणात विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत शासनाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या लाभार्थी योजना, स्पर्धात्मक परीक्षा संबंधित योग्य माहिती दिली. शिक्षक पालक संघाची संरचना आणि त्याची माहिती सांगत असतानाच संस्था तसेच शासन स्तरावर विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देऊन पालकांना अवगत केले. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठी उत्साही पालक यांची निवड करून विविध समित्या स्थापन केल्या. कार्यक्रमाचे आभार प्रसन्न ठाकूर यांनी मानले तर सूत्रसंचालन श्रद्धा मॅडम यांनी केले. या वेळी पालकांची उपस्थिती लक्षणीय होती.

# पुनर्वसित इर्शाळवाडीवर महिला मंडळातर्फे वृक्षारोपण

**चौक :** पुनर्वसन करण्यात आलेल्या इर्शाळवाडीवर स्नेहल महिला मंडळाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

गेल्या वर्षी १९ जुलै २०२३ रोजी इर्शाळवाडीत दुर्घटना घडली. सद्या राज्य सरकारच्या वतीने नम्राची वाडी येथे पुनर्वसन काम प्रगतिपथावर आहे. ४२ कुटुंबाची गृह प्रकल्प योजना ज्या ठिकाणी सुरू आहे, त्यांच्या प्रांगणात औषधी वनस्पती, बेलाचे झाड, कडू निंब व फळांच्या झाडांची लागवड चौक येथील स्नेहल महिला मंडळाच्या वतीने करण्यात आली. या वेळी महिला मंडळाच्या अनेक सदस्या उपस्थित होत्या.



# पावसामुळे पाणीपुरवठा सुरळीत

**पनवेल : वार्ताहर**

एप्रिल, मे, जून या तीन महिन्यात पनवेल तालुक्यातील ५० गाव, वाड्या, वस्तीमध्ये पंधरा टँकरच्या सहाय्याने पाणीपुरवठा सुरू होता, मात्र पाऊस पडत असल्याने २८ जूनपासून पनवेल तालुका टँकरमुक्त झाला असल्याची माहिती पंचायत समिती पनवेलकडून देण्यात आली.



मार्च महिन्यापासून पनवेल तालुक्यात तीव्र पाणीटंचाई सुरू होते. पाण्याची पातळी खोलवर गेल्याने मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण होते. ग्रामपंचायतच्या अहवालानुसार टँकरने होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. गेले काही दिवसांपासून मुसळधार पाऊस झालेला नसला तरीदेखील चांगल्या प्रकारे पाऊस कोसळत आहे. त्यामुळे टँकरने होणारा पाणीपुरवठा २८ जूनपासून बंद करण्यात आला. गत काही वर्षांच्या तुलनेत यावर्षी पनवेल तालुक्यातील सर्वाधिक ५० गाव वाड्यांसाठी टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. यावरून पाण्याची किती टंचाई जाणवू लागली आहे हे समजेल.

काही वर्षांपूर्वी पनवेलमधील मोजक्याच गावांसाठी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता, मात्र आता पाणीटंचाईग्रस्त गावांनी अर्ध शतक गाठले आहे. कमी-अधिक प्रमाणात पाऊस कोसळत असल्याने नद्या, विहिरींमध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे पाणी गेलेल्या बोरवेललादेखील पाणी आले आहे.

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात लोक वस्ती प्रचंड प्रमाणात वाढत असल्याने पाण्याचे हवे तसे नियोजन करण्यात आलेले नाही. पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल वर अवलंबून राहावे लागत असल्याने ठराविक काळानंतर बोअरवेलचे पाणी कमी होते तर आदिवासी बांधवांना कडी कपारीतून दोन-तीन किलोमीटर चालत जाऊन पाणी आणावे लागते.

### गावांना टँकरने होणारा पाणीपुरवठा बंद

सुरुवातीला १३ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. त्यानंतर दोन टँकर वाढवण्यात आले. जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापासून काही गावातील टँकरने पाणीपुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर २८ जूनपासून सर्वच १५ टँकर बंद करण्यात आले.

# युपीतून खून करून पळालेला आरोपी पनवेल पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

उत्तर प्रदेशमधील गोरखपुर जिल्ह्यातील झंगहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोघांची हत्या करण्याचा प्रयत्न करून आरोपी झाला होता. आरोपीची माहिती देणाऱ्याला उत्तर प्रदेश सरकारने ५० हजारांचे बक्षीस लागू केले होते, मात्र तरीही दोन वर्षे उत्तर प्रदेश पोलिसांच्या हातावर तुरी देत आरोपी गौतम गौड ठिकाण बदलत होता. अशा परिस्थितीत पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे त्याला शोधून काढून ताब्यात घेतले आहे.

गेल्या काही दिवसांपासून तो आरोपी बदलापुर, ठाणे परिसरात वास्तव्यास आहे,



अशी माहिती उत्तर प्रदेश पोलिसांना मिळाली होती. या संदर्भात उत्तर प्रदेश पोलिसांनी नवी मुंबई पोलिसांना कळविले. त्यानंतर पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक स्वप्निल केदार व पथकाने आरोपीचा शोध घेण्यासाठी बदलापुर गाठले. बदलापूरमध्ये एका भाड्याच्या घरातून आरोपीला पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेऊन पनवेल पोलीस ठाण्यात आणले. आरोपीला पोलिसी खाक्या दाखवताच, उत्तर प्रदेशमधील गुन्ह्याची कबूली दिली.

आरोपीला पनवेलच्या प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची रवानगी तळोजा मध्यवर्ती कारागृहात केली आहे. दरम्यान, पनवेल शहर पोलिसांकडून आरोपीचा ताबा घेण्यासाठी उत्तर प्रदेश पोलिसांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात परिसंवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. ६) वाजता माहिती व तंत्रज्ञान विभागाच्यावतीने तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी प्रकल्प मार्गदर्शनावर परिसंवादाचे आयोजन केले होते.



या परिसंवादासाठी पिल्लई महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातील प्रा. सागर यशवंतराव यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रकल्पाचे प्रकार, प्रकल्पासाठी विषय कसा निवडावा, प्रकल्पाच्या पद्धती, वर्गीकरण व डेटा कलेक्शन व त्यातील बारकावे याविषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या परिसंवादासाठी महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्प हा फक्त विषयामध्ये चांगले गुण मिळवण्यासाठी महत्त्वाचा नसून त्यामधून नवीन काहीतरी शिकणे व त्याचा वापर वैयक्तिक जीवनामध्ये केला पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.

या परिसंवादाचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. मनीषा शिलेदार, प्रा. सोनी पांडे, प्रा. नीलम मोरे, प्रा. सादिया शेख व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# ट्रकच्या चाकाखाली येऊन एकाचा मृत्यू; सहकारी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

केटीएम मोटर सायकलवरून देवळोली गाव येथून पनवेल बाजूकडे येत असताना टाईम्स बार समोर एका ट्रेलरचालकाच्या बेदरकारपणे चालविण्यामुळे मोटरसायकलला धडक बसल्याने मोटरसायकलवरील एक जण ट्रकच्या चाकाखाली येवून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे तर त्याचा सहकारी जखमी झाला असून या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दिपेश धोने (वय २२) हा त्याचा मित्र श्रीराम पिल्लई (वय २९) याच्या केटीएम मोटार सायकलवरून पनवेल बाजूकडे येत असताना ट्रेलर चालक जग्गू कोल (वय ३९) याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर अचानकपणे उजव्या बाजूला घेतल्याने त्यांची मोटरसायकल ट्रेलरच्या मागच्या बाजूने दबली गेली. ते ट्रेलरच्या मागील बाजूस सापडून श्रीराम पिल्लई हा ट्रकच्या मागील चाकाखाली आला. यात गंभीररित्या जखमी होवून त्याचा मृत्यू झाला आहे. दिपेश धोने हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाने धडक दिल्याने या अपघातात जसपाल रविदास याचा मृत्यू झाला. या प्रकरणी अनोळखी वाहन चालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कुंडेवहाळ गावाच्या हद्दीमध्ये डिजिटेक फिल्म स्टुडिओ नावाचा स्टुडिओ आहे. या स्टुडिओमध्ये चार लोक काम करतात. ३ जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास स्टुडिओमध्ये काम करत असलेला जसपाल रविदास याची सिक्युरिटीची ड्युटी होती, मात्र संध्याकाळी सात वाजता जसपाल रविदास फिरण्यासाठी बाहेर पडला. या वेळी अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली व त्यात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.





**पनवेल : एसटी डेपोकडून शहराकडे येणाऱ्या मार्गावर कै. वसंतराव नरसाळे मार्ग दाखविणारा बोर्ड पडीक झाला होता. ही बाब येथील नागरिक खंडेश धनावडे यांनी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना सांगितली. त्यांनी तत्काळ पाठपुरावा करून महापालिकेकडून धोकादायक बोर्ड काढून त्या जागी नवीन बोर्ड बसवून घेतला.**

# रुग्ण महिलेवर अत्याचार; चौकशी सुरू

**पनवेल : वार्ताहर**

नांदेड येथील रुग्ण महिलेला उपचाराच्या बहाण्याने खारघरमध्ये आणून अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. महिलेच्या प्रकृतीत सुधार झाल्यानंतर तिने या संदर्भात नांदेड येथे पोलिसांकडे तक्रार केली असता त्याठिकाणी गुन्हा दाखल करून खारघर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. नांदेड येथे राहणाऱ्या २६ वर्षीय महिलेसोबत डिसेंबर महिन्यात हा प्रकार घडला आहे. महिला शाररिक व मानसिक व्याधीने त्रस्त होती. यामुळे तिच्यावर ठिकठिकाणी उपचार सुरू होते. यादरम्यान त्यांच्याच परिचयाच्या एका व्यक्तीने त्यांना ओळखीच्या ठिकाणी उपचार करून देतो असे सांगितले होते. त्यामुळे महिलेने त्याच्यावर विश्वास ठेवला असता तो तिला घेऊन खारघरमध्ये आला होता. त्या ठिकाणी त्याने तिला एका घरात आश्रयासाठी नेऊन गुंगीचे औषध देऊन अत्याचार केला.

दरम्यान, अगोदरच रुग्णावस्थेत असल्याने त्यातच घडलेल्या या प्रकारामुळे महिलेला मानसिक धक्का बसला होता. दरम्यान, नुकतेच प्रकृतीत झालेल्या सुधारानंतर महिलेने तिच्यासोबत घडलेल्या कृत्याची नांदेड पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यावरून घटना खारघर परिसरात घडलेली असल्याने गुन्हा पुढील तपासासाठी खारघर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे, मात्र याबाबत महिलेकडे चौकशी झाल्यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस येईल, असे खारघर पोलिसांनी सांगितले.

# भारतीय वंशाचा जीवन संधेर लंडनमध्ये खासदार

## उद्योजक विजय लोखंडे यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष, उद्योजक विजय लोखंडे यांचे व्यावसायिक भागीदार व अनिवासीय भारतीय उद्योजक हरभजनसिंग संधेर यांचा मुलगा लंडनमध्ये खासदार झाल्याने पनवेल औद्योगिक वसाहतीमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

उद्योजक हरभजनसिंग संधेर हे पनवेल औद्योगिक वसाहतीचे सदस्य आहेत.



नुकत्याच लंडनमध्ये (ब्रिटन) संसदीय निवडणुका झाल्या, त्यात उद्योजक हरभजनसिंग संधेर यांचा धाकटा मुलगा जीवन संधेर हा लेबर पार्टीतर्फे लॉफबरो येथून निवडून आला आहे. तो पहिल्यांदाच निवडणुकीसाठी उभा राहिला आणि निवडूनही आला. पनवेल औद्योगिक वसाहतीसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. जीवन संधेर हा खासदार म्हणून निवडून आल्याबद्दल पनवेल औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे यांनी खास अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संधेर खासदार झाल्याने पनवेल औद्योगिक वसाहतीमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# सिद्धांत सेवा संस्थेकडून वृक्षारोपण

## नवीन कार्यकारिणीचीही झाली निवड

**पनवेल : प्रतिनिधी**

सिध्दांत संस्थेच्या वतीने रविवार दि. ३० जून २०२४ रोजी करंजाडे कोपर चिंतामणी गणेश मंदिरासमोर सिडकोने बांधलेल्या जॉगिंग ट्रॅकच्या कडेने वृक्षारोपण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचार्यांनी सामाजिक बांधिलकीची भावना मनात ठेवून संस्थेमार्फत हा कार्यक्रम केला .

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब बोरकर व सदाशिव म्हात्रे साहेब (उद्योगपती) उपस्थित होते. सकाळी १० वाजता करंजाडे कोपर चिंतामणी गणेश मंदिरासमोर सिडकोने बांधलेल्या जॉगिंग ट्रॅक च्या कडेने झाडे लावण्यात आली. त्यामध्ये वड, पिंपळ, गुलमोहर,आंबा, फणस, चिंच, अशोक, जांभूळ, शिरस अशी सावली देणारी व ऑक्सीजन देऊन पर्यावरण संतुलित ठेवणाऱ्या झाडांचा समावेश आहे. सिद्धार्थ सेवा संस्थेमध्ये असणारे सभासद हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचारी तथा अधिकारी वर्ग आहे. सामाजिक बांधिलकीची भावना मनात ठेवून संस्थेमार्फत नेहमीच समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येतात.

वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपल्यानंतर संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चिंतामणी गणेश मंदिराच्या सभागृहात घेण्यात आली. या वेळी सन २०२४ - २०२७ या कालावधी करिता नवीन कार्यकारणीची नेमणूक करण्यात आली. ज्यामध्ये विजयकुमार संभाजी कोळी यांची अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली.

### नूतन कार्यकारिणी

***अध्यक्ष विजय कोळी, उपाध्यक्ष शशिकांत गोरड, कार्याध्यक्ष गजानन गायकवाड, सचिव मिलिंद जाधव, खजिनदार अरुण दुष्मिकर, सहसचिव महावीर उरणकर, संघटक सचिव प्रफुल्ल गजरे, प्रसिद्धी सचिव विनायक यादव, कार्यकारीणी सदस्य म्हणून विशाल वाघमारे, वसंत वास्के, अक्षय दुष्मीकर अंतर्गत हिशेब तपासणीस किरण साळवी.***





**पनवेल : भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांचे वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, अमरीश मोकल, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, के.सी. पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभीष्टचिंतन केले.**

# भाजपतर्फे खारघरमध्ये वृक्षारोपण उत्साहात



**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रदेशाने सुचविल्याप्रमाणे आईच्या नावावर एक झाड हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम रेनबो स्कूल इंटरनॅशनल, सेक्टर ३५, खारघरच्या मोकळ्या मैदानावर शालेय विद्यार्थ्यांसह भारतीय जनता पक्ष, खारघर शहर मंडलाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाला.

या वेळी सरचिटणीस दीपक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना जसे आपण आपल्या आईवर प्रेम करता तसेच या झाडांवर प्रेम करा, फक्त झाडे न लावता ते चांगले जगले पाहिजेत याची काळजी घ्या, असा संदेश देऊन शिक्षकांना प्रत्येक एक झाड मुलांनी त्यांच्या आईच्या नावाचा टॅग लावून त्या झाडाचे संगोपन मुलांकडून करवून घेण्याच्या सूचना दिल्या तर जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांनी ग्लोबल वार्मिंग मुळे पर्यावरणाचे खूप नुकसान होत असून झाडे लावणे किती महत्त्वाचे आहे, असे सांगितले.

खारघर उपाध्यक्ष यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांना उन्हाळ्यात झाडांना पाणी व खताची व्यवस्था करून देण्याचे आश्वासन दिले. आईच्या नावाने एक झाड ही संकल्पना देशाचे पंतप्रधान यांनी जागतिक पर्यावरणाच्या दिवशी दिली. ही मोहीम संपूर्ण देशात उत्साहात सुरू आहे.

या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, सरचिटणीस अ‍ॅड. नरेश ठाकूर, उपाध्यक्ष विनोद घरत, सचिन वास्कर, प्रभाग तीन अध्यक्ष जगदीश घरत, अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष मन्सूर पटेल, प्रभाकर जोशी, प्रमोद पाटील, जयदास तेलवणे, अल्पसंख्यांक मोर्चा सरचिटणीस इर्शाद शेख, सोशल मीडिया अध्यक्ष अजय माळी, नवनीत मारू, भागवत गायकवाड, कुणाल गायकवाड, प्रीतम करावकर, मच्छिंद्र चौधरी, विनोद भुसा, सुशीला शर्मा, प्रिया दळवी, नुतन सिंग, सारिका जाधव, नूतन डांगळे, बबिता कसबे, रेनबो स्कूलचे प्रिन्सिपल सुमित्रा बॅनर्जी, पूजा देवडे, सकींना तीनवाले, तन्सीन शिकारी, नंदा जगताप व शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# बावर्ची @ ५२

## निखळ मनोरंजनाची टेस्ट आजही कायम

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जींचा चित्रपट म्हणजे, स्वच्छ, निखळ, कौटुंबिक मनोरंजनाची हमी. (एखादा बुड्ढा मिल गया रहस्यरंजक तसाच एखादा संगीतमय आलाप फसलेला. चालायचंच. काही गोष्टी इकडेतिकडे होणारच.)

असाच त्यांचा मस्त जमलेला मनोरंजक चित्रपट बावर्ची. मुंबईत रिलीज ७ जुलै १९७२. बघा ना, तब्बल बावन्न वर्ष होऊनदेखील तो आपल्या डोळ्यासमोर आहे. पुन्हा पुन्हा एन्जॉय करता येतोय. यशस्वी चित्रपटाची हीच तर ताकद व ओळख असते. काळ बदलत राहिला तरी त्या कलाकृतीची खासियत कायम राहते.

इट इज सो सिंपल टू बी हॅपी.... बट इट इज डिफिकल्ट टू बी सिंपल...

'बावर्ची'च्या रघुचे (राजेश खन्ना) हे असे सरळ सोपे असे आयुष्याचे तत्वज्ञान. प्रत्येक चित्रपटाचे आपले एक व्यक्तिमत्व असतेच असते. 'निमल' वेगळा नि 'मुंज्या' वेगळा. आजही 'बावर्ची'चा सरळ साधा स्वभाव खूप आकर्षित करतो हे या चित्रपटाचे सर्वात मोठे यश आहे. आजच्या वेगवान जीवनशैलीतही हा चित्रपट वेळ काढून पहावा आणि रिचार्ज व्हावे. राजेश खन्नाच्या काही वैशिष्ट्यांतील एक म्हणजे, तो हृषिकेश मुखर्जीच्या चित्रपटासाठी अर्धे वा सर्वसाधारण मानधन घेई. याचाच अर्थ तो दर्जेदार कामाची कदर करीत असे. 'बावर्ची'चे मुंबई वितरण विभागात हक्क शक्ती सामंता व राजेश खन्ना यांच्या शक्ती राज फिल्म या वितरण संस्थेकडे होते. या जोडीने त्या काळात आणखी काही चित्रपट वितरित केले. (अनुराग वगैरे. तो शक्ती सामंता यांचाच चित्रपट व राजेश खन्ना विशेष भूमिकेत.) राजेश खन्नाने आविष्कार या चित्रपटासाठी निर्माता व दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांजकडूनही कमी मानधन घेऊन चांगल्या कलाकृतीला प्राधान्य दिले. सुपर स्टार असला तरी तो समजदार होता, संस्कारी होता.

त्या दिवसात 'आनंद' (१९७१)नंतरचा दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी आणि सुपर स्टार राजेश खन्ना यांचा चित्रपट कोणता बरे असेल याची चित्रपटसृष्टी, प्रसारमाध्यम आणि चित्रपट रसिकांना उत्सुकता असतानाच 'बावर्ची'च्या चित्रीकरणास सुरुवात झाली. अंधेरी कुर्ला रोडवरील मोहन स्टुडिओ हृषिदांचा विशेष आवडता. आपल्या अनेक चित्रपटांचे मुहूर्त आणि चित्रीकरण त्यांनी मोहन स्टुडिओतच केले. (दिग्दर्शक आणि त्याचा आवडता स्टुडिओ हेही एक विशेष समीकरण) खरंतर राजेश खन्नाच्या सुपर स्टारचा झंझावात सुरू असतानाचा हा काळ होता. त्याची डायरी दोनेक वर्ष फुल्ल आहे असे म्हटले जाई. त्याची बातमी होई. राजेश खन्ना म्हणजे कलरफुल बातमी असे ते दिवस होते. 'या चित्रपटाच्या सेटवरून त्या चित्रपटाच्या सेटवर' अशी जणू पळापळ करीत राजेश खन्नाने दिवसातील दोन तीन तास काढत 'आनंद'ला उत्कटपणे न्याय दिला (या चित्रपटाच्या शूटिंगचे अनेक दुर्मिळ किस्से, आठवणी रमेश देव सांगत.) 'आनंद'च्या भावपूर्ण यशानंतर राजेश खन्नाला हृषिदांच्या दिग्दर्शनात अधिकाधिक मोकळेढाकळेपणाने वावरणारी व्यक्तिरेखा हवी होती. तपन सिन्हा लिखित व दिग्दर्शित 'गलयो होईओ सत्ती' (१९६६) या बंगाली चित्रपटावर आधारित 'बावर्ची' निर्माण करायचं ठरले. 'आनंद'चेच निर्माते हृषिकेश मुखर्जी, एन.सी. सिप्पी, रोमू एन. सिप्पी यांनी 'बावर्ची' निर्मितीचे पाऊल टाकले आणि राजेश खन्नाच्या सहकार्यातून वर्षभरात चित्रपट पूर्ण करीत प्रदर्शितही केला. मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर मेट्रो (नि जोडीला मिनर्व्हाही) होते हे विशेष. मध्यमवर्गीय रसिकांना आपलंस वाटेल असे हे निर्भेळ मनोरंजन होते. त्या काळाशी सुसंगत स्वच्छ दिलखुलास मनोरंजन. राजेश खन्नाच्या विलक्षण क्रेझ असल्याच्या दिवसांतील हा चित्रपट. तरी बरं बावर्ची



रूपात त्याने चित्रपटभर टोपी घातलीय नि हेअरस्टाईल त्यात लपली गेलीय. त्याने अभिनय मात्र उत्फूर्त केलाय.

रघू (अर्थात राजेश खन्ना) शांती निवासमध्ये राहत असलेल्या शर्मा आडनावाच्या एका भल्या मोठ्या एकत्र कुटुंब पद्धतीत 'बावर्ची' (स्वयंपाकी वा आचारी) म्हणून येतो आणि आपल्या खेळकर, खोडकर, मिस्कील, बडबड्या स्वभावाने मग या कुटुंबातील भाऊ भाऊ, जावा जावा, चुलत भावंड यांच्यातील छोट्या छोट्या गोष्टीतील अभिमान, व्यर्थ वाद, काहीसा असलेला वा दडलेला अहंकार बाजूला पडत जातो. या कुटुंबाच्या एकूणच वागण्याला, त्रासाला कंटाळून या टुमदार निवासात कोणी स्वयंपाकी टिकत नसतो असेही एक वैशिष्ट्य. रघू एक प्रकारे 'कुटुंब क्रांती' करतो. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे थोडेसे विस्कळीत होत जात असलेले नातेसंबंध तो हसत खेळत जुळवून आणतो, कुटुंबात वा घरात सकारात्मक दिलखुलास वातावरण निर्माण करतो असे या चित्रपटाचे मध्यवर्ती सूत्र. हा सगळा कुटुंब कबिला छान हसते खेळते आयुष्य जगू लागते. त्यांच्या हरवलेल्या जुन्या सवयी पुन्हा एकदा जाग्या होतात. रघु त्यांना आपल्या कुटुंबातीलच एक वाटतो.

या कुटुंबात जया भादुरी (तोपर्यंत ती बच्चन झाली नव्हती.), उषा किरण, दुर्गा खोटे, हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय, ए.के.




हनगल, असरानी, मा. राजू हे कलाकार. गुणी कलाकारांची एक सक्षम फळीच हृषिदांनी जमवली. (येथे दिग्दर्शक दिसतो म्हणूया) आणि त्यांचा वापरही उत्तम रितीने केला. तोही असा की 'भोर आयो...' या गाण्यावर दुर्गा खोटे यांचा चक्क पद्न्यास पहायला मिळतो. काय छान एक्स्प्रेशन्स दिलीत हो त्यांनी. कम्माल. असरानी संगीतकार रजनीकांत न्यारेलाल यांचा (हे नाव कोणावरून ते सांगायची गरज नाहीच.) सहाय्यक विश्वनाथ शर्मा. त्याचे काम एकच, विदेशी गीत संगीत ऐकून त्यावरुन काही सुचतयं का (खरंतर कॉपीच) हे पहायचे. हिंदी चित्रपट संगीतात तेव्हा ते होऊ लागले होते. संस्कृत नाटकाच्या सूत्रधाराप्रमाणे अमिताभ बच्चन कथेचे सार सांगायला सुरुवात करतो आणि चित्रपट सुरू होतो आणि हृषिदा आपल्याला रघुच्या माध्यमातून शांती निवासमध्ये घेऊन जातात. चित्रपटाच्या अखेरीस अमिताभ बच्चन म्हणतो, रघू किसी नये घर की तलाश मे जा रहा है... आशा है वो आपका घर नहीं होगा... गुलजार यांचा हा संवाद अखेरीस छान गुगली टाकतो. संपूर्ण चित्रपटात गुलजार यांच्या संवादांची खुसखुशीत मेजवानी आहे. सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला शहरात एकत्र कुटुंब पद्धती हळूहळू मागे पडायला सुरुवात झाली होती (पण तीच आवश्यक होती) अशा वेळी त्याच एकत्र कुटुंब पद्धतीतील गोडवा आणि जिव्हाळा या चित्रपटात वेगळ्या पद्धतीने रंगतो. हृषिकेश मुखर्जी स्वतः चित्रपट संकलनाचे जाणकार असल्याने या छोटेखानी चित्रपटाची गती त्यांनी उत्तम राखलीय. चित्रपटाचे संकलक दास धायमाडे यांनी अंतिम आकार उत्तम दिला आहे. संकलन चित्रपटाची भाषा स्पष्ट करतो. हृषिदांच्या चित्रपटाचे हुकमी छायाचित्रणकार जयवंत पाठारे यांनी चित्रपटाचा मूड चांगला पकडलाय. कैफी आझमी यांच्या गीताना मदन मोहन यांचे संगीत आहे. तुम बिन जीवन कैसा जीवन (पार्श्वगायक मन्ना डे), भोर आई गया अधिपारा (किशोरकुमार, मन्ना डे, हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय, लक्ष्मी शंकर), मस्त पवन डोला रे (लता मंगेशकर), मेरे नैना बहाल नीर (लता मंगेशकर) या गाण्यांचा यात समावेश आहे. नृत्य दिग्दर्शन गोपीकृष्ण यांचे आहे. भारतीय शास्त्रीय संगीतातील ही गाणी आहेत.

'बावर्ची'च्या निर्मितीतील एक बहुचर्चित गोष्ट सांगायलाच हवी. खरंतर गॉसिप्स. अमिताभ बच्चन व जया भादुरी यांचे एक नजर, बन्सी बिरजू या चित्रपटातून एकत्र काम करता करता सूत जमले. ते बरेच जवळ आले आणि आता तर बावर्चीच्या सेटवर जया भादुरीला भेटायला अमिताभ यायचा. अर्थात आनंद रिलीजनंतरचे हे दिवस. अमिताभ व जया दोघेही हृषिदांचे लाडके, पण अमिताभ जयाला भेटायला सेटवर येतोय हे राजेश खन्नाला आवडत नव्हते. अधूनमधून तो यावरून शेरेबाजी करायचा. एकदा मात्र जयाचा संयम सुटला, ती तडकली आणि एक दिवस अमिताभचा असेल वगैरे तिने त्याला ऐकवले हा किस्सा गाजला. इतका की आजही तो खुलवून रंगवून सांगितला जातो. गॉसिप्सला खतपाणी हे तर नेहमीचेच.

'बावर्ची'ची त्यानंतर तमिळ भाषेत तसेच कन्नड भाषेत दोनदा रिमेक झाली. एकदा नाव होते, नंबर ७३ शांती निवास. मराठीत



कोणालाच या चित्रपटाची रिमेक करावीशी वाटली नाही हे चांगले की वाईट? फार पूर्वीच झाली असती तर नक्कीच रंगली असती. (राजकुमार हिरानी दिग्दर्शित 'मुन्नाभाई एमबीबीएस'चा लेखक अभिजित घोष याने म्हटलंय, मुन्नाभाई हसत खेळत मांडायची प्रेरणा बावर्ची पाहून घेतली.) चित्रपटाचा आशय कौटुंबिक आनंद घेणारा असल्याने त्याची रिमेक होणे स्वाभाविक. दिग्दर्शक डेव्हिड धवनने गोविंदाला घेऊन 'हीरो नंबर वन' नावाने रिमेक केली (ही हुकमी नि जमलेली अशी दिग्दर्शक व कलाकार जोडी.) पण मूळ चित्रपटातील सहजता आणि साधेपण त्यात हरवले होते आणि तद्दन विनोदी चित्रपट करण्याचा प्रयत्न झाला होता. त्याचे हसे झाले. गोविंदाकडून काय अपेक्षा ठेवायची असंही कोणी कोणी म्हटलं. हृषिकेश मुखर्जी म्हणजे मध्यमवर्गीय आणि मध्यममार्गी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे दिग्दर्शक म्हणून ओळखले गेल्याने त्यांच्या यशस्वी चित्रपटांचे प्रमाण जास्त आहे आणि त्यांच्या दिग्दर्शनाबाबत चित्रपटसृष्टी, रसिक प्रेक्षक व प्रसारमाध्यमात आपुलकी आणि विश्वासार्हता होती. त्यांच्या दिग्दर्शनीय चित्रपटांचे प्रगती पुस्तक सांगायचे तर मुसाफिर (१९५७), अनाडी (१९५९), अनुराधा (१९६०), असली नकली (१९६२), अनुपमा (१९६६), आनंद, गुड्डी, बुड्ढा मिल गया (तीनही १९७१), अभिमान, नमक हराम (दोन्ही १९७३), चुपके चुपके, चैताली, मिली (तीनही १९७५), गोलमाल, जुर्माना (दोन्ही १९७९), खुबसुरत (१९८०), बेमिसाल (१९८२) इत्यादी अनेक चित्रपट आहेत. त्यातील 'बावर्ची' स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेला आणि बावन्न वर्षानंतरही तितकाच तजेलदार आणि हलका फुलका चित्रपट आहे. सत्तरच्या दशकात नंतर तो मॅटीनी शोला तसेच दूरदर्शनवर पहायला गेला. नंतरच्या काळात व्हिडीओ, चॅनल, यू ट्यूब चॅनल असा पहायला जातोय. एक चित्रपट असा प्रवास करत करत वाटचाल करतो. तुम्ही अद्याप पाह्यला नसेल तर आवर्जून पहालच आणि यापूर्वी अनेकदा एन्जॉय केला असेल तर पुन्हा करा. स्वच्छ मनोरंजक चित्रपट म्हणून आजही ओळखला जातोय.

अशातच एके दिवशी बातमी आली, हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित आनंद, मिली व बावर्ची आणि गुलजार दिग्दर्शित कोशिश या चित्रपटांचा रिमेक करण्यात येतेय. आता जुन्या चित्रपटाची रिमेक हा फंडा नवीन नाही, पण काही चित्रपटांची रिमेक नको हो. त्याची मूळ प्रतिमाच कायम राहूदेत. हे चित्रपट पुन्हा पुन्हा अनेकदा पाहिले गेले, आवर्जून पाहिले जातात, यू ट्यूबवर उपलब्ध आहेत तर मग रिमेकने काय बरे साध्य होणार? 'बावर्ची'चा रिमेक कोण करतेय? निर्माते आहेत, अब्बास सेनगुप्ता जादुगर यांची जादुगर फिल्म आणि समीर राज सिप्पी. (मूळ 'बावर्ची'च्या निर्मात्यांमधील एन. सी. सिप्पी यांचा नातू) तर दिग्दर्शिका आहे अनुश्री मेहता. (मिसेस अंडरकव्हर या चित्रपटाची दिग्दर्शिका. या चित्रपटात राधिका आपटे आहे.) अनुश्री दत्ता हृषिकेश मुखर्जी व मनमोहन देसाई यांची जबरदस्त चाहती आहे. बावर्ची, चुपके चुपके, अमर अकबर ॲन्थनी, मिस्टर इंडिया हे तिचे फेवरेट चित्रपट. यावरुन तिला पारंपरिक लोकप्रिय मनोरंजक चित्रपट आवडतात असे दिसते. म्हणून काय तिने 'बावर्ची'च्या रिमेकचा विचार करायचा? जावेद अख्तर यांनी एका मुलाखतीत म्हटले, धीस फिल्म इज द ग्रेट इंडियन जॉईंट फॅमिली इज न Extinct कॉन्सेप्ट. या चित्रपटाच्या रिमेकमध्ये रणवीर सिंग फिट्ट बसेल असे म्हटलेय. त्यांच्या मताशी सहमत व्हायचं का? आज एकत्र कुटुंब पद्धती किती प्रमाणात शिल्लक आहे. शहरी नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्गात सातत्याने एकाद्या छान फूड पॉईंटवरून खाणे मागवले जातेय. कुटुंबाचा आचारी अथवा कुटुंबातीलच एक झालेला घरातील सर्व कामे करणारा ही कॉन्सेप्ट आज शिल्लक ती किती आहे? 'बावर्ची'चा रिमेक करताना हे सामाजिक, कौटुंबिक भान ठेवले तर बरे. जगणचं बदललंय तसा बावर्ची ही बदललाय आणि तो आचारी न राहता कूक अथवा शेफ झालाय. ऐसपैस घरात फॅशनेबल किचन आलेय. पारंपरिक खाद्य संस्कृतीच्या जोडीला इटालियन फूड्स, रशियन फूड्स असे अनेक इंटरनॅशनल फूड्स आलीत. या सगळ्यात हा कूक अथवा शेफ त्या घरातील कुटुंबातील सुख-दुःखे ओळखणार कधी नि हलकी करणार कशी नि कधी?

'बावर्ची'चा काळच वेगळा होता. तरी चित्रपट आजही एन्जॉय करता येतोय तर मग पोट भरायला हवे तरी काय? आजच्या फास्ट फूड संस्कृतीने हा चित्रपट अवश्य पहावा नि एन्जॉय करावा.

# भारत इतिहास संशोधक मंडळाचा वर्धापन दिन

भारताच्या व विशेषतः मराठेशाहीच्या इतिहासाचे संशोधन करणारी भारतातील एक अग्रगण्य स्वायत्त संस्था. तिची स्थापना ७ जुलै १९१० रोजी इतिहासाचार्य वि.का. राजवाडे आणि खं.चिं. मेहंदळे यांनी केली.

भारताच्या सर्वांगीण इतिहास संशोधनासाठी आवश्यक ती ऐतिहासिक साधने संग्रहित करून त्यांचे शास्त्रशुद्ध जतन व प्रदर्शन करणे आणि त्यांसाठी आवश्यक अशा इमारती बांधणे ही संस्थेची सुरुवातीची उद्दिष्टे होती. पुढे ही साधने आणि भारतीय इतिहास व संस्कृती यांविषयीचे संशोधनात्मक ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे कामही संस्थेने अंगीकारले. संस्थेच्या घटनेनुसार मंडळाचा प्रमुख अध्यक्ष असून प्रशासकीय व्यवहार चिटणीसांमार्फत केला जातो. मंडळाचे वार्षिक व आजीव असे एकूण ५५० सभासद होते. १३ सभासदांचे कारभारी मंडळ दर तीन वर्षांनी निवडतात. त्यातून चिटणीसांची निवड होते. विद्यमान तीन चिटणीस असून कार्याध्यक्ष व खजिनदार हे सर्व सभासदांनी प्रत्यक्ष निवडून द्यावयाचे असतात. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड दर तीन वर्षांनी सर्वसाधारण सभेत होते. सभासदांना ग्रंथालय, पोथीशाळा, दप्तरखाना इ. विभागांत संशोधन करण्याची सुविधा आहे. मंडळ दर तीन महिन्यांनी ऐतिहासिक निबंध, वृत्ते वगैरे सामग्रीसाठी एक मासिक प्रसिद्ध करते. तेही सभासदांना विनामूल्य मिळते.



मंडळातील अस्सल साधनांची चार भागांत व दालनांत विभागणी केली आहे : (अ) लेख्यशाळा : यात मोडी पत्रव्यवहार, कागदपत्रे, हिशोब वह्या, फार्सी कागदपत्रे, महजर, करीने, सनदा असे भिन्न भाषांतील मिळून सोळा लाख कागद मंडळात आहेत. यात आदिलशाही, शिवकाल, पेशवाई इत्यादीतील जवळपास पन्नास घराण्यांचे कागद आहेत. (आ) पोथीशाळा : यातील तेहतीस हजार हस्तलिखित ग्रंथांपैकी सतरा हजारांची सूची प्रसिद्ध झाली आहे. हे ग्रंथ संस्कृत, मराठी, फार्सी, कन्नड इ. भाषांतील असून त्यांपैकी दोनशे पोथ्या सचित्र आहेत त्या धार्मिक, ज्योतिषविषयक व काव्यांच्या आहेत. त्यांची स्वतंत्र सूची तयार करण्याचे काम चालू आहे. सचित्र पोथ्यांपैकी गीतापञ्चरत्नी, शकुनवंती, सिंहासनबत्तीशी (संस्कृत) व तारीख-इ-हुसेनशाही (फार्सी) या उल्लेखनीय असून फार्सी सचित्र प्रत ही जगातील दुर्मिळ ग्रंथांपैकी एक आहे. (इ) चित्रशाळा : यात एकूण बाराशे दुर्मिळ लघुचित्रे आहेत. भिन्न भिन्न काळातील ही चित्रे विभिन्न शैलीतील आहेत. त्यांत रागरागिणी, बारामास, व्यक्तिचित्रणे, परंपरागत सजावटी यांची चित्रणे असून त्यांतील तालचित्रे उल्लेखनीय आहेत. या विषयावर अन्यत्र असा संग्रह नाही. याशिवाय अकबर, जहांगीर यांची व्यक्तिचित्रणे तसेच मराठेशाहीतील पहिला बाजीराव, नानासाहेब, रघुनाथराव, थोरला माधवराव, सवाई माधवराव, नाना फडणीस, महादजी शिंदे, हरिपंत फडके यांची अस्सल चित्रेही आहेत. शिवाय पाउणशेच्यावर काचचित्रे आहेत. (ई) नाणी : सोने, चांदी, तांबे इ. धातूंची सुमारे सात हजार नाणी मंडळाच्या संग्रही असून ती कालदृष्ट्या सातवाहन काळापासून अठराव्या शतकापर्यंतच्या कालखंडातील निरनिराळ्या राजघराण्यांची आहेत. (उ) ताम्रपट : चालुक्य, राष्ट्रकूट व यादव या वंशांचे एकूण ३० ताम्रपट तसेच अनेक मूर्ती, वीरगळ, शस्त्रे, वस्त्रे, नकाशे अशा विविध वस्तू या विभागात आहेत. (ऊ) प्रयोगशाळा : आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून त्यात कागदपत्रांच्या रक्षणासाठी त्यांवर पारदर्शक कागदाचा थर देऊन ती टिकावू करण्यासाठी लॅमिनेशन करणे, नाणी व इतर वस्तू स्वच्छ करणे इ. कामे चालतात. (ए) संशोधन विभाग : कागदपत्रांचे संपादन, नाण्यांचे व ताम्रपटांचे वाचन इ. वृत्तांत प्रसंगोपात्त प्रसिद्ध झालेले आहेत. पुरातत्व संशोधनाच्या दृष्टीने १९४९मध्ये कराड येथे मंडळाने उत्खनन केले. त्यानंतर १९८०पासून दौलताबादच्या मध्ययुगीन संस्कृतीचे संशोधन करण्याच्या व उत्खननाच्या प्रकल्पात डेक्कन कॉलेज (पुणे) व मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद) यांच्याबरोबर मंडळाने भाग घेतला आहे. (ऐ) ग्रंथालय : मंडळात संशोधकांना उपयुक्त असे अठरा हजार दुर्मिळ ग्रंथ असून प्रतिवर्षी त्यांत नवीन पुस्तकांची भर पडते. शिवाय पंचेचाळीस नियतकालिके मंडळात नियमित येतात. ग्रंथालयाला जोडूनच संशोधकांसाठी अभ्यासिकाही आहेत.

मंडळाने इतिहासतज्ज्ञांचे अनेक संशोधनपर ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यांत प्रामुख्याने मंडळाने जमविलेल्या अस्सल साधनांचे प्रकाशन आहे. स्वीय मालेतील एकशे पंधरा प्रकाशने असून त्यांपैकी (१) मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १ ते १२ (राजवाडे, वि.का.), (२) ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ ते ६ (खरे, ग.ह. कुलकर्णी, गो. त्र्यं.), (३) दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड १ ते ४ (खरे, ग. ह.), (४) फार्सी - मराठी कोश (पटवर्धन, मा.त्रिं.), (५) पुणे नगर संशोधन वृत्त, खंड १ ते ४, (६) महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख (दीक्षित, मो.गं.), (७) ताल पेंटिंग्ज (रानडे, उषा चव्हाण, कमल), (८) भागवत पुराण पेंटिंग्ज (माटे, म.श्री. रानडे, उषा) इ. प्रमुख ग्रंथ होत. याशिवाय मंडळाने पुरस्कृत केलेले अनेक ग्रंथ आहेत.

प्रतिवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मंडळाचे वार्षिक संम्मेलन भरते. तसेच मंडळाचा वाढदिवस, पाक्षिक सभा इ. प्रसंगी मंडळाचे सभासद, अभ्यासू व्यक्ती एकत्र येऊन शोधनिबंधाचे वाचन व चर्चा होते. इचलकरंजीकर स्मृतिदिन व्याख्यानमाला, शिवचरित्रावरील व्याख्यानमाला, करवीर व्याख्यानमाला इ. व्याख्यान-सत्रे ही ज्ञानप्रसाराची मंडळाची मुख्य साधने होत. रामदास निर्वाण त्रिशताब्दी चर्चासत्र, नाणकशास्त्र परिषद, महाराष्ट्र इतिहास परिषद अशी विशेष चर्चासत्रे विशेष प्रसंगी मंडळात होतात. मंडळाने म.मो. दत्तो वामन पोतदार यांच्या स्मरणार्थ 'पोतदार प्रतिष्ठान' स्थापले असून त्याद्वारे मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासाचे वर्ग चालवले जातात. त्याचप्रमाणे मोडी -फार्सीचेही वर्ग चालतात. मंडळाचे विद्यामान अध्यक्ष ह. धी. सांकलिया असून कार्याध्यक्ष ग.ह. खरे आहेत. यापूर्वी मंडळाला ग.व्यं. जोशी, वासुदेवशास्त्री खरे, का.ना. साने, चिंतामणराव वैद्य, न.चिं. केळकर व मालोजीराव नाईक-निंबाळकर असे अध्यक्ष लाभले.

सभासद वर्गणी, शासकीय व निमशासकीय अनुदाने, व्यक्तिगत आणि सार्वजनिक देणग्या यांवर मंडळाची आर्थिक भिस्त असून मंडळाच्या इमारतीसाठी व ग्रंथालयासाठी देणग्या मिळाल्या. त्यांतील १९२९मधील डॉ. जस्टिन बट यांची ३० हजार डॉलर्सची देणगी विशेष उल्लेखनीय होती. त्यानंतर जुन्या इमारतीशेजारी नवी इमारत बांधण्यासाठी महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांनी सु. तीन लाखांचे अनुदान दिले. तसेच मराठ्यांचा इतिहासाच्या स्वतंत्र दालनासाठी पुणे महापालिकेने २५ हजार रुपयांचे अनुदान दिले. याशिवाय मंडळाचे एक माजी कार्यकर्ते रा.वि. ओतूरकर यांनी वडिलांच्या स्मरणार्थ २५ हजार रुपये दिले. त्यातून त्रैमासिक आणि ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचा खर्च केला जातो. याशिवाय छोट्या-मोठ्या अनेक देणग्या मंडळाला मिळाल्या व मिळतात. अनेक ऐतिहासिक नाणी, वस्तू व कागदपत्रे मंडळाला संशोधकांनी दिली. मंडळाच्या प्रकाशानासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासन प्रतिवर्षी काही अनुदान देते.

**-उषा रानडे (मराठी विश्वकोष)**

# कथाकार, कादंबरीकार आणि समीक्षक प्रा. लक्ष्मण जोग



लक्ष्मणराव गणेश जोग यांचा जन्म ७ जुलै १९२३ रोजी देवरूख (जि. रत्नागिरी) येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण रत्नागिरी येथे व महाविद्यालयीन मुंबईत झाले. विद्यार्थिदशेत त्यांच्यावर प्रा. न.र.फाटक व समीक्षक वा.ल.कुलकर्णी यांचा प्रभाव पडला. आरंभी गिरगावातील शारदासदन येथे शिक्षक व नंतर राणी पार्वतीदेवी महाविद्यालय बेळगाव, नॅशनल महाविद्यालय वांद्रे आणि रूपारेल महाविद्यालय मुंबई येथे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले.

'आभाळाचा रंग निळा' या जोगांच्या कादंबरीत एका सुसंस्कृत मनाचे व्यापार जसेच्या तसे व्यक्त झाले असून त्यापूर्वीच्या त्यांच्या 'काळोख आणि किरण' या पहिल्या कादंबरीत त्यांचे अनुभव बोलके झाले आहेत. 'मी जे महाविद्यालयीन जीवन अनुभवले त्यातूनच ही कलाकृती जन्मली' असे ते म्हणतात. विद्यापीठीय स्तरावर निःसंशय साहाय्यभूत ठरेल असे 'दीपस्तंभ' व 'दीपदर्शन' हे समीक्षाग्रंथ त्यांनी लिहिले. 'साहित्यात जे-जे नवे काही घडत असते, त्याचा शोध घ्यावा ही माझ्या साहित्यप्रेमी मनाची आवड आहे,' असे त्यांनी म्हटले आहे. 'तेंडुलकरांना सभ्यतापूर्ण जीवनाहून वेगळे जीवन दाखवायचे आहे' असे विधान करून जोग लिहितात, 'सखाराम वा घाशीराम यांचे लेखन लेखकाचे प्रचंड सामर्थ्य प्रत्ययाला आणून देते. हे सामर्थ्य सर्वस्पर्शी न होणे ही फार मोठी वाङ्मयीन शोकांतिका ठरेल.' जोगांनी तत्कालीन गाजलेल्या नवीन नाटक, कादंबऱ्या, काव्यसंग्रह, कथा ह्यांविषयी समीक्षकाच्या दृष्टीने आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. 'दीपस्तंभ'मध्ये व्यक्त झालेल्या जोगांच्या विचारानुसार 'समीक्षा हीपण एक साधनाच असते... निर्भयपणा, कलाकृतीच्या निर्मितीच्या स्वरूपाची जाण, भावजीवनाविषयी सहानुभूती हे गुण समीक्षकापाशी असले, तर लेखक त्याच्या मताची कदर करायला तयार असतात... सदोष कलाकृतीही चांगल्या असू शकतात. गेल्या १०-१२ वर्षांत (सुमारे १९५८-१९७०) मराठी साहित्यात किती बदल झाला आहे, नवे कसे, कोणते अवतरले आहे याचा अस्पष्ट आलेख छोट्या समीक्षाग्रंथांत आढळू शकेल.'

'श्रेष्ठ कलाकृतीचा एक निकषच असा असतो की, प्रत्येक वाचनाचे वेळी त्यातून नवे विचारधन व सौंदर्यकण मिळत जातात.' असे जोगांचे मत आहे. उपरोक्त पुस्तकांव्यतिरिक्त 'लावण्य क्षितिजे', 'अरूपाचे रूप' व 'संत नामदेव' ही पुस्तकेही जोग यांनी लिहिली आहेत.

**-वि.ग. जोशी**

# रोहा-नागोठणे रस्त्याची दुरवस्था



धाटाव : प्रतिनिधी

रोह्यात खड्ड्यातले रस्ते आणि अपघात हे नेहमीचेच समीकरण झाले आहे. पावसाने उखडलेल्या रस्त्यांमुळे वारंवार अपघात होत आहेत. नागरिक आणि वाहनधारक जीव मुठीत घेऊन प्रवास करित आहेत प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

आता तर पावसाने चांगलाच जोर धरला आहे. अशातच नागोठणे रोहा या मार्गावर रेल्वे उड्डाणपूलाच्या ठिकाणी आणि अष्टमी नाक्यावर रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. पावसाचे पाणी खड्ड्यात साचून दिवसेंदिवस अपघातांमध्ये वाढ होत आहेत. त्यामुळे या मार्गावरील कायमस्वरूपी खड्डे बुजवून रस्त्याचे मजबूतीकरण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

रेल्वे उड्डाणपूलाचा ठेकेदार मे. आर. के. मधानी व एमआरआयडीसीचे अधिकारी यांच्या दुर्लक्षितपणामुळे उड्डाणपुलाचे बांधकाम गेल्या अडीच वर्षांपासून पूर्ण झाले नाही. रेल्वे उड्डाणपूलाच्या कामामुळे नागोठणे रोहा रस्त्याची पार वाट लागली आहे. येथे पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे सलग तिसऱ्या पावसाळ्यात नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो आहे. खाच-खळगे आणि इथे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे अनेक अपघात होत आहेत. नागरिकांमधून रेल्वे प्रशासनाविरोधात प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

**हॅम (हायब्रीड न्युटी मॉडेल) अंतर्गत मंजूर झालेल्या अलिबाग रोहा रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. करारनाम्यातील अटी व शर्तीनूसार या मार्गावर रेल्वे उड्डाणपूलाचे बांधकाम सुरू असल्यामुळे खराब झालेल्या रस्त्याचे मजबूतीकरण आणि दुरुस्ती रेल्वे प्रशासनाने करायची आहे.**

**-जगदीश सुखदेवे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग-अलिबाग**

## खंडित वीजपुरवठ्याने गणेश मूर्तिकार हैराण; महावितरणला निवेदन



पेण : प्रतिनिधी

पेण हे गणेश मूर्तीचे माहेरघर असल्यामुळे येथून गणेश मूर्ती बाहेर गावी व बाहेरच्या देशात जात असतात, परंतु दर मंगळवारी व रोज सतत वीजपुरवठा अनेक तास खंडित होत आहे. यामुळे सर्व गणेश मूर्ती कारखानदारांचे कामकाज बंद राहून नुकसान होत आहे. यासाठी गणेश मूर्तिकार आणि व्यावसायिक कल्याणकारी मंडळातर्फे पेण महावितरणाला निवेदन देण्यात आले आहे.

पेण शहरात मोठमोठे गणपती कारखानदार व्यावसायिक आहेत. सदरच्या व्यवसायावरच कारखानदारांचा आणि कारखान्यात काम करणाऱ्यांचा कामगारांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. यंदा गणेशोत्सवाची तारीख ७ सप्टेंबर आहे. त्यामुळे जुलै आणि ऑगस्ट हे दोन महिने कामाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहेत. या दोन महिन्यात संपूर्ण वर्षाचा व्यवसाय अवलंबून असतो, परंतु सततच्या खंडित वीज पुरवठ्यामुळे गणेश मूर्तीकार हैराण झाले असून सर्व गणेश मूर्तीकार कारखानदारांनी पेणमधील महावितरणचे अधिकारी सिद्धार्थ खोब्रागडे व धनंजय पाटील यांना निवेदन दिले आहे.

यंदा गणेश उत्सव जवळ आल्याने आमच्या सर्व गणपती कारखानदारांची धावपळ उडाली आहे. आम्ही बँकेचे कर्ज काढून किंवा सोनेनाणे गहाण ठेवून काम करीत असतो, परंतु वारंवार वीज खंडित होत असल्याने आमचे काम वेळेत पूर्ण होत नाही आणि जर आमच्या व्यापाऱ्यांना वेळेत गणेश मूर्ती पोहोच झाल्या नाहीत तर त्याचा परिणाम आमच्या धंद्यावर होईल यासाठी आमची एकच मागणी आहे की, दोन महिने हा वीज पुरवठा खंडित करू नका, असे आवाहन गणेश मूर्ती कारखानदार सागर पवार यांनी या वेळी केले.

## चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण



धाटाव : प्रतिनिधी

वनविभाग रोहा, वनविभाग मुरूड परिमंडळ चणेरा यांच्यामार्फत १५ ते ३० सप्टेंबर हा कालावधी वन महोत्सव म्हणून साजरा केला जातो. वृक्ष लागवड व वृक्षदिंडी काढून वनाचे महत्त्व पटवून दिले जाते. आजच्या पिढीला वनाचे महत्त्व समजण्यासाठी विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीच्या उपक्रमाचे महत्त्व पोहचविणे गरजेचे आहे. या उपक्रमामुळे जी.डी.टी. फ्युचर स्कुल सुडकोली येथे कार्यक्रम आयोजित केला.

या वेळी स्कुलचे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष संदीप तटकरे, सचिव प्रकाश सरकले, संचालक देवेंद्र चांदगावकर, जी. डी. टी. फ्युचर स्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य नुरिना शिंगरे, शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी मिळून पन्नास वृक्षांची लागवड करण्यात आली.

या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी मुरूड प्रियंका पाटील, नवपाल आर. जी. गायकवाड, व्ही.जी. वाघमारे, वनरक्षक गोविंद खेडकर, इंधे, त्रिभूवन उपस्थित होते.

## खोपोली इनरव्हील क्लबचा पदग्रहण सोहळा

खोपोली : प्रतिनिधी

इनरव्हील क्लब ऑफ खोपोलीचा पदग्रहण सोहळा २९ जून २०२४ रोजी रोटरी क्लब हॉल सहकार नगर येथे करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्याच्या डॉ. रोहिणी पटवर्धन वृद्धकल्याणशास्त्र तज्ञ ह्या उपस्थित होत्या. माजी अध्यक्ष श्रीदेवी राव यांनी आपली अध्यक्षपदाची सूत्रे नवनिर्वाचित अध्यक्ष जयश्री कलोशी यांच्याकडे देण्यात आली २०२४-२५ या वर्षासाठी त्या काम पाहणार आहेत.

२०२३-२४ या वर्षभरात इनरव्हील क्लब खोपोली जे प्रोजेक्ट केले त्याचा अहवाल मागील अध्यक्ष श्रीदेवी राव यांनी सादर केला, या कार्यक्रमाच्या वेळी रोटरी क्लब खोपोलीचे अध्यक्ष मिलिंद बोधनकर, सचिव पिळ्ळे सर, माजी अध्यक्ष नीरज जाधव, हास्य क्लबच्या सदस्या सावित्री जाधव, लायन्स क्लब सदस्या व इनरव्हील क्लबच्या सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होत्या.



## मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

रायगड : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील ६५ वर्ष वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करणेकरिता मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे.

पात्र वृध्द लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थतता/ दुर्बलतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. सहाय्यभूत आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणेकरीता तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ.द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत पात्र वृध्द लाभार्थ्यांना ३००० रुपये त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येतील.

या योजनेबाबत अधिक माहिती व योजनेचे अर्ज प्राप्त करणेसाठी रायगड जिल्हातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण रायगड कच्छिभवन, नमिनाथ जैन मंदिरा जवळ, श्रीबाग रोड, अलिबाग, जि. रायगड ४०२२०१ या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव यांनी केले आहे.

# रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाचा जिल्हा मेळावा उत्साहात





माणगाव : प्रतिनिधी

रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ आयोजित सन्मान सोहळा व संघाचे राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे व राज्य सचिव कमलाकर मांगले यांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार समारंभ तसेच जिल्हा मेळावा माणगाव येथे कुणबी भवन हॉल ठिकाणी शनिवारी (दि. ६) आयोजित करण्यात आला होता.

या वेळी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे राज्याचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष दळवी, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत चेरफळे, जिल्हा सचिव कुणाल लोंडे, उपाध्यक्ष दिनेश पाटील, जिल्हा सहसचिव रवींद्र आयरे, जिल्हा सदस्य ढेणे पाटील, दिनेश टेंबे, माणगाव तालुकाध्यक्ष अ. जलील फिरफिरे, सचिव मनोहर धुमाळ, जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष गायत्री शेलार यांच्या सह रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटील बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना बाळासाहेब शिंदे म्हणाले की, मुलींची संख्या शाळांत परीक्षांच्या निकालात जास्त आहे. त्यांना ३३ टक्के आरक्षण असून यापुढे महिलांची प्रगती पाहता ते ७० टक्क्यांपर्यंत जातील व पुरुष ३३ टक्क्यांपर्यंत येतील. रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटनेने आमचा आयोजित केलेला सत्कार हा कृतज्ञतापूर्वक सोहळा आहे. पोलीस पाटलांचे मानधन १५००० रुपये होण्यासाठी आम्ही सातत्याने जवळपास १००० निवेदने देऊन व वेळोवेळी मंत्रालयात जाऊन मंत्र्यांना भेटलो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याला १५००० रुपये मानधन देण्याचे मान्य करून आज आपल्या पोलीस पाटलांना १५००० रुपये दरमहा मानधन मंजूर केले आहे. पोलीस पाटलांच्या प्रलंबित प्रश्नाच्या बाबतीतही आपण प्रयत्नशील असून पोलीस पाटलांना किमान १००० भत्ता मिळावा यासाठीही आपले प्रयत्न सुरू आहेत.


## पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांची विद्यमान मालक **श्री. कीशोर बाळाराम केणी व ईतर** यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. कीशोर बाळाराम केणी व ईतर** यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
**ULPIN : १८३९४५०३६१०, तालुका उरण जिल्हा – रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७/३<br>खाते क्रमांक १९५ | १ | ०.४६.००<br>पो.ख ०.०४.८० | ५.३५ |
| | | **एकूण क्षेत्र ०.५०.८०** | |

**श्री. कीशोर बाळाराम केणी व ईतर यांच्या एकूण ०.५०.८० क्षेत्रापैकी विक्रीचे १६ आर**

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार मिळकत, विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून ७ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ६ जुलै २०२४**

**सही/-**
**एड. निलेश झंजाड**
बी १०४ सफायर सी.एच.एस.लि. सेक्टर २२
भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे ता. पनवेल,
जि. रायगड बि. सं. क्र. ९९२०४७५८०१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल **मे. लिना इंटरप्राइझेस तर्फे भागिदार 1. श्री. फेलिक्स बाप्टीस्ट डिसोझा, 2. श्री. अरूणकुमार रोशनलाल मेहता, 3. श्री. रोहित अरूणकुमार मेहता, 4. श्री. प्रमोदकुमार अरूणकुमार मेहता,** ऑफिस पत्ताः 506, पाचवा मजला, गौरी कॉम्पेक्स, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुबंई. यांनी मुळ मालक **1) श्री. चंद्रकांत मधुकर भोईर, 2) सौ. नयना हेमंत पाटील, 3) श्री. धंनजय पांडुरंग भोईर, 4) श्रीमती मंगला नरेश भोईर, 5) श्री. स्वप्नील नरेश भोईर, 6) कु. विणु उर्फ विणा नरेश भोईर उर्फ सौ. विना सचिन तांडेल, 7) कु. तेजश्री नरेश भोईर उर्फ सौ. तेजश्री होशांग भोईर,** 1 ते 7 रा. मु.पो. जसखार, ता.उरण, जि. रायगड. **8) श्री. दत्तात्रेय सदु उर्फ सदानंद उर्फ सदाशिव घरत, 9) श्री. पंढरीनाथ सिताराम घरत,** 8 व 9 रा. अविंकावाडी, नागाव, ता.उरण, जि. रायगड, **10) श्री. अनिल दामोदर उर्फ दामु घरत,** पत्ताः-रूम नं. 54, 0-1 प्लॉट नं. 54 1/2, राजन बाग, एस.एन.रोड, अॅन्टॉप हिल, मुंबई -37 यांच्याकडून खालील नमुद केलेली मिळकत त्रिपक्षीय कराराव्दारे कायमस्वरूपी हस्तांतरीत करीत आहेत.

**संपादित मिळकतीचे वर्णन**
**मौजे – द्रोणागिरी, ता.उरण, जि. रायगड येथील**
**फाईल क्र. जेएनपीटी 159**

| नोड | ब्लॉक क्र. | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| द्रोणागिरी/ जेएनपीटी | 7 | 35 | जे 05 | 2074 चौ.मी. |

कोणीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भूखंडासंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असे तर त्याच्या पुष्टयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सूचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरूप यांची माहिती अन्य तपशिलसह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भूखंड ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनातून मुक्त आहे असे मानण्यात येईल आणि आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

दिनांकः 06/07/2024

**अॅड. स्वाती पालांडे,**
**अॅडव्हाकेट, हायकोर्ट**
**22, प्रभात सेंटर, सेक्टर - 1 ए,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई**
मो. नं **9930964549**



## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

**४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल**

**ताबा सूचना**

**(स्थावर मालमत्तेकरिता)**
**(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियमन, २००२ नुसार)**

ज्याअर्थी,

मी, श्री. नितिन जिवन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि., बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ९ आणि कलम १३ (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या दिनांकास मागणी सूचना जारी करून संबंधित कर्जदारा/रांकडे प्रत्येक खात्यासमोर उल्लेखिलेली रक्कम सूचनेच्या दिनांकापासून/ सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदारसदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की,याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमनाच्या नियम ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्याच्या समोर उल्लेखिलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्ते/त्तांबाबत कोणताही व्यवहार हा दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.च्या रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/गहाणवटदार/ जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक) | गहाणवट मालमत्तेचे वर्णन | मागणी सूचनेचा दिनांक | ताबा सूचना चिटकवण्याचा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकास थकबाकी रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. व्ही. पी. इन्फ्राटेक (कर्जदार),<br>श्री. विजय कालू पाटील (भागीदार/गहाणवटदार),<br>सौ. मेघा विजय पाटील (भागीदार/गहाणवटदार),<br>श्री. रुपेश नारायण (जामीनदार),<br>श्री. मंगेश गोविंद पिलविलकर, (जामीनदार) | ग्रामपंचायत मोठी जुई, घर क्र. १२०/ई, खोली क्र. ५, दुसरा मजला, क्षेत्रफळ - ६५४ चौ.फू.<br><br>ग्रामपंचायत मोठी जुई, दुकान क्र. १२०/२, क्षेत्रफळ - ३०९ चौ.फू., गाव मोठी जुई, ता. उरण, जि. रायगड. श्री. विजय कालू पाटील यांच्या नावे. | १८.०४.२०२४ | ०२.०७.२०२४ (सांकेतिक) | दि. ३१.०३.२०२४ रोजीनुसार रु. २३,२३,३२८.४४ (रुपये तेवीस लाख तेवीस हजार तीनशे अठ्ठावीस व पैसे चव्वेचाळीस मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०४.२०२४ पासूनचे व्याज. |
| २ | श्री. बलराम चहू ठाकरे (कर्जदार),<br>श्री. कृष्णा विठ्ठल भोईर (जामीनदार),<br>श्री. रमेश धनराज पाटील (जामीनदार) | श्री. बलराम चहू ठाकरे यांच्या नावे असलेले घर क्र. ७२७, गाव - ननोशी, ता.-पनवेल, जि.- रायगड - ४१०२०६. क्षेत्रफळ - २३४० चौ.फू. | ०४.०५.२०२४ | ०५.०७.२०२४ (सांकेतिक) | दि. ३०.०४.२०२४ रोजीनुसार रु. १७,३६,७६५.६० (रुपये सतरा लाख छत्तीस हजार सातशे पासष्ट व पैसे साठ मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०५.२०२४ पासूनचे व्याज. |
| ३ | श्री. धानजी धर्मा म्हात्रे (कर्जदार),<br>श्री. विश्वास जगन्नाथ फेटकर (जामीनदार),<br>श्री. निलेश जनार्दन गावंड (जामीनदार) | धानजी म्हात्रे यांच्या नावे असलेले घर क्र. २४३, गाव - वालवली, ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्रफळ - १०३४ चौ.फू. | ०४.०५.२०२४ | ०५.०७.२०२४ (सांकेतिक) | दि. ३०.०४.२०२४ रोजीनुसार रु. ३,९८,४४८.०० (रुपये तीन लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे अठ्ठेचाळीस मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०५.२०२४ पासूनचे व्याज. |
| ४ | सौ. नैना प्रविण देशमुख (कर्जदार),<br>श्री. मुकेश नागेंद्र उपाध्या (जामीनदार),<br>श्री. किशोर टिकाराम देशमुख (जामीनदार) | नैना प्रविण देशमुख यांच्या नावे असलेले दुकान क्र. २, तळमजला, मानसरोवर को-ऑप. सोसा., मालमत्ता क्र. ६०५/१ - बी, नित्यानंद मार्ग, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्रफळ - १९२ चौ.फु. | ०४.०५.२०२४ | ०५.०७.२०२४ (सांकेतिक) | दि. ३०.०४.२०२४ रोजीनुसार रु. ६,५४,२०५.०० (रुपये सहा लाख चौपन्न हजार दोनशे पाच मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.०५.२०२४ पासूनचे व्याज. |

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**दिनांकः ०५.०७.२०२४**
**ठिकाणः पनवेल**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

## निवडक

### अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई :** महापालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्रांर्तगत मोजमापाचे आरसीसी बांधकाम, कॉलम व फुटींगचे काम अनिधकृतरित्या सुरू होते. त्यानुसार त्यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६चे कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही. त्यामुळे शुक्रवारी (दि. ५) नेरूळ विभागाअंतर्गत या ठिकाणी उभारण्यात आलेले अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची संयुक्त कारवाई नेरूळ, अतिक्रमण विभागातील कर्मचारी यांचे समवेत सुरक्षारक्षक यांच्यामार्फत करण्यात आली आहे. मोहीमेकरीता १८ मजुर, एक मुकादम, सहा ई-हमर, दोन गॅस कटर व दोन पीकअप व्हॅन वापरण्यात आले आहे.

### सानपाड्यात आज विविध कार्यक्रम

**नवी मुंबई :** सानपाड्यात विविध ठिकाणी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासह विविध कार्यक्रमाचेही यानिमित्ताने आयोजन करण्यात आले आहे. सानपाडा सेक्टर ७ व ८ मधील सिताराम मास्तर उद्यानात वृक्षारोपणाचा कार्यक्रम सकाळी ९ ते ११ या वेळेत होणार आहे. त्यानंतर सानपाडा सेक्टर ७ मधील आश्रय हॉलमध्ये सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० दरम्यान नवीन मतदार नोंदणी व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. त्यानंतर सांयकाळी ५ वाजता सानपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयकुमार पन्हाळे कायद्यात झालेले नवीन बदल याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. सांयकाळी ६ वाजता विवेकानंद शाळेचे संकुलप्रमुख विलास वाव्हळ विद्यार्थ्यांना व रहीवाशांना करिअरबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

# नवी मुंबईत निघाली स्वच्छता दिंडी

**नवी मुंबई : बातमीदार**

'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या नामगजरात बेलापूर विभागामध्ये करावे येथील ज्ञानदीप विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता दिंडीत मोठ्या संख्येने सहभागी होत स्वच्छता आणि पर्यावरणाचा संदेश प्रसारीत केला. नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत विविध स्वच्छता विषयक उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये विविध वयोगटातील नागरिक मोठया संख्येने सहभागी होत आहेत.



१७ जुलै रोजी देवशयनी आषाढी एकादशी असून श्रीविठ्ठल भेटीसाठी राज्यभरातून लाखो वारकरी दिंडया - पताका नाचवत पंढरपूरच्या दिशेने निघालेले आहेत. अशा वारीमय वातावरणात विदयार्थ्यांना वारीची परंपरा प्रत्यक्ष अनुभवता यावी व या माध्यमातून संत सज्जनांनी सांगितलेला स्वच्छता व पर्यावरण संरक्षणाचा संदेश प्रसारीत व्हावा यादृष्टीने 'स्वच्छता दिंडी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये पाचशेहून अधिक शालेय विद्यार्थी पारंपारिक वेशभूषा करून उत्साहाने सहभागी झाले होते. यात विठ्ठल व रखुमाईच्या वेशभूषेतील विद्यार्थी, संत ज्ञानेश्वर - संत तुकाराम अशा संतांच्या वेशातील विद्यार्थी, छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ आणि मावळयांच्या वेशातील विद्यार्थी हे या दिंडीचे आकर्षण होते.

दिंडीत सहभागी विद्यार्थी समुहांनी विविध जनजागृतीपर संदेश हे त्याविषयीचे फलक प्रदर्शित करीत व घोषणा देत प्रसारित केले. काही विद्यार्थी समुहांनी ओलू-सुकू व घातकूचे फलक उंचावत कचरा वर्गीकरणाचा स्वच्छता संदेश प्रसारित केला. सध्या 'सफाई हटाओ - बिमारी भगाओ' हे अभियान राष्ट्रीय स्तरावर राबविले जात असून या स्वच्छता दिंडीमध्ये आरोग्य रक्षणाचाही संदेश विदयार्थी समुहांनी तसे फलक उंचावून व घोषणा देत नागरिकांपर्यंत पोहचवला. काही विद्यार्थी समुहांनी 'वृक्ष लावा-वृक्ष जगवा' असा संदेश वृक्षरोपे हातात घेऊन प्रसारित केला. वाचनाचे महत्व अधोरेखित करणाऱ्या पुस्तके हातात घेऊन फलकांव्दारे वाचनजागृती करणाऱ्या विद्यार्थी समुहांची उपस्थितीही लक्षणीय होती. त्याचप्रमाणे संतांची छायाचित्रे असणारे फलक प्रदर्शित करीत महाराष्ट्राच्या संत परंपरेचाही दिंडीत जागर करण्यात आला. दिंडीत सहभागी ओलू, सुकू व घातकू या मॅस्कॉट्सची उपस्थितीही लक्षवेधी होती.

करावे येथील ज्ञानदीप विद्यालयाच्या पटांगणापासून सुरू झालेली स्वच्छता दिंडी ही ढोल - ताशे व बॅंडच्या गजरात नेक्सस सिवूड मॉलच्या दिशेने विविध घोषणा देत निघाली तेव्हा रस्त्याच्या दूतर्फा उभे राहून नागरिक या उपक्रमाचे कौतुक करीत होते.

नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त शशिकांत तांडेल यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता दिंडीसारख्या आगळया वेगळया उपक्रमावेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्यासह प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे, कार्यकारी अभियंता संजय पाटील, स्वच्छता अधिकारी सुर्यकांत म्हात्रे आणि ज्ञानदीप सेवा मंडळ शाळेचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी आणि शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सुरुवातीला करावे येथे परिमंडळ १चे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या हस्ते स्वछता दिंडीतील पालखीचे पूजन करण्यात आले व सामुहिक स्वच्छता शपथ ग्रहण करण्यात आली. तेथून पायी निघालेल्या स्वच्छता दिंडीची सांगता नेक्सस सिवूड मॉलच्या समोरील मोठ्या पॅसेजमध्ये करण्यात आली. येथे ज्याप्रमाणे वारीमध्ये पारंपारिक रिंगण घातले जाते, संतांचे अभंग गायले जातात, दिंडया - पताका नाचविल्या जातात, फुगडी व इतर खेळ खेळले जातात अशा कार्यक्रमांद्वारे माझी वसुंधरा अभियानाची शपथ घेऊन स्वच्छता दिंडीचा समारोप करण्यात आला.

### 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ'ला प्रतिसाद

'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४'च्या अनुषंगाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर व त्यामध्ये व्यापक जनसहभाग घेण्यावर नवी मुंबई महापालिकेमार्फत भर दिला जात आहे. याच धर्तीवर 'स्वच्छता दिंडी' हा अभिनव उपक्रम विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांच्या एकत्रित सहभागातून राबविण्यात आला असून या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर मिळालेला उत्साही प्रतिसाद नवी मुंबईकर नागरिकांची स्वच्छतेविषयी असलेली जागरुकता सिध्द करणारा आहे.

---

## प्रामाणिकपणाचे कौतुक! सापडलेले सोन्याचे मंगळसूत्र पोलीस ठाण्यात जमा



**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथे सेक्टर ६ मध्ये राहणारे सुनील सुराणा यांनी त्यांना सापडलेली सोन्याचे मंगळसूत्र पोलीस ठाणे येथे जमा केले.

या मंगळसूत्राचे वजन १० ते १२ ग्रॅम होते. सुनील सुराणा हे मनोरुग्ण असल्याचे माहिती घेताना समोर आले असून मनोरुग्ण असतानाही त्यांनी सोन्याचे मंगळसूत्र इमानदारीने परत केल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांचा कामोठे पोलीस ठाण्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत तायडे, पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत व पोलीस अंमलदार आदी उपस्थित होते.



**पनवेल : स्व. दशरथ पुंडलिक शेळके यांच्या पुण्यतिथीनिमित्त रायगड जिल्हा परिषद शाळा चिंचवली येथे शालेय विद्यार्थ्यांना दप्तर तसेच अंगणवाडी शाळेत वह्यावाटप करण्यात आले. या कार्यक्रम भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी उपसरपंच रमेश पाटील, माजी सदस्य सुनील शेळके, रामदास शेळके, विठ्ठल शेळके, गुरुनाथ करमेळकर, दयेश जांभळे, विनायक भगत, संदीप शेळके, संतोष शेळके, दिलीप हजारे, बाळू शेळके, दिनेश करमेळकर तसेच शाळेतील शिक्षक आणि शालेय कमिटी अध्यक्ष उपस्थित होते. अमर शेळके आणि अनिकेत शेळके यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.**

---

## सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये खाद्यजत्रा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात सांस्कृतिक समितीतर्फे (दि. ६) खाद्यजत्रेचे आयोजन करण्यात आले. पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे यांच्या हस्ते खाद्यजत्रेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

या उपक्रमासाठी मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे तसेच पर्यवेक्षिका वैशाली पारधी हे मान्यवर उपस्थित होते. बारावी कला वाणिज्य व विज्ञान विभागातील ४४ गटांनी या खाद्यजत्रेत आपापल्या खाद्य स्टॉलची उत्कृष्ट मांडणी केली होती.

सीकेटी संकुलातील सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जत्रेत सहभागी होऊन खाद्य पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेतला. पाणीपुरी, चायनीजभेळ, पुरणपोळी, मोदक, पावभाजी, व्हेज कटलेट, चिकन भाकरी, पेस्ट्री, कॉर्न चॅट, आलू चॅट, कोल्ड्रिंक यासारख्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी मांडले होते. खाद्यपदार्थांचे दर माफक असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद बघायला मिळाला. अशा उपक्रमातून निश्चितच विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच व्यावसायिक प्रेरणा मिळत असते.

सांस्कृतिक समितीतर्फे या उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते. या उपक्रमासाठी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळातर्फे फुंडे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**उरण : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक वर्ष २०२४ २५मध्ये श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे, उरण येथे इयत्ता पाचवी ते दहावी अखेरच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात आल्या.



विद्यालयाचे लेखनिक श्री. नवनीत ठाकूर सर व श्री. दिगंबर पाटील सर यांच्या प्रयत्नातून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुमारे २००० वह्यांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. दातृत्वाचे महामेरू, शिक्षण प्रेमी, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर दरवर्षी श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील विविध शाळांना मोफत वह्या वाटप करीत असतात आणि त्याचा लाभ फुंडे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी होत असतो.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे, स्कूल कमिटी सदस्य उमेश म्हात्रे यांच्या हस्ते ४ व ५ जुलै रोजी विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. विद्यालयाच्या वतीने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे मनापासून आभार मानण्यात आले.

---

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

### शालेय साहित्यवाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे एमआयडीसीमधील बोनसारी गांव येथील नालंदा बुद्ध विहारामध्ये वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभा शाखा बोनसारी यांच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी विभागातुन १० - १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून महामानव साहित्य प्रसारक सोशल फाउंडेशनचे संस्थापक सुनिल भोले यांच्या वतीने शालेय साहित्य भेट देण्यात आले. तर सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार वंचित बहुजन आघाडी चे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलीप बंदीचोडे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष बंदीचोडे यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून स्थानिक नागरिकांशी संवाद साधुन मुलभूत सुविधा व इतर अडी अडचणीविषयी आपण पाठपुरावा करून लवकरात लवकर सोडवु असे आश्वासन दिले.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते दीपक गायकवाड, कल्याणराव हणवते, सुभाष बलखंडे, ज्ञानेश्वर जाधव इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक पदाधिकारी दिनकर सोनावणे, खिराजी धापसे, बड्डु आवचरमल, जयश्री गायकवाड, अनिता शिंदे, शोभा धापसे, कमल धुरंधर पवित्राबाई वाव्हळ इत्यादी पदाधिकारी यांनी सहकार्य केले.




## 'कविता डॉट कॉम'चा वर्धापन दिन साजरा




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील वाशी येथील साहित्य मंदिरात कविता डॉट कॉम या साहित्य चळवळीचा प्रथम वर्धापन दिन उत्स्फूर्त प्रतिसादात झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संमेलनाध्यक्ष अरुण म्हात्रे यांच्या लेखनीतून साकारलेले झी मराठी वाहिनीवर उंच माझा झोका या मालिकेचे शीर्षक गीत सुरज डान्स अकॅडमी यांनी सुंदरपणे सादर केले.

त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व उद्घाटक साहेबराव ठाणगे यांच्या हस्ते तुळसी वृंदावनास पाणी घालून उद्घाटन झाले. वारकऱ्यांच्या वेशभूषेत पालखी साहित्य मंदिरात दाखल झाली व त्यातील ग्रंथ पुर्व संमेलनाध्यक्ष अशोक बागवे यांनी या वर्षीचे संमेलनाध्यक्ष अरूण म्हात्रे यांच्या कडे देत अध्यक्ष पदाचे सुत्र सुपुर्द केले. त्यानंतर स्वागताध्यक्ष शिवव्याख्याते प्राचार्य रविंद्र पाटील यांनी कविता डॉट कॉमचा दोन वर्षांचा प्रवास मांडत आगामी काळातील नियोजन सर्वांपुढे ठेवत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

दुसऱ्या सत्रात सत्रात निमंत्रितांचे कवी संमेलन पार पडले. ज्यामध्ये कवी सतीश सोळांकुरकर, प्रथमेश पाठक, संदीप राऊत, विजय उतेकर, रत्नमाला शिंदे, यामिनी दळवी यांच्या बहारदार कवितेसोबत नवी मुंबई महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे यांच्या निवेदनाने रंगत कार्यक्रमात रंगत आणली.

तिसऱ्या सत्रात लोककवी प्रशांत मोरे यांनी कवितेवर भाष्य करत आपल्या सुरेल आवाजात विविध कविता सादर करत मैफिल गाजवली. संमेलनाध्यक्ष अरूण म्हात्रे यांनी कवितेचे विवेचन करून विविध आठवणी व किस्से सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जितेंद्र लाड, वैभव वर्हाडी, शंकर गोपाळे,रूद्राक्ष पातारे, अनिल उबाळे, अनिल सकपाळ, विलास समेळ यांनी विशेष मेहनत घेतली.

## विद्यार्थ्यांसाठी देय असलेल्या शासकीय योजनांच्या प्रचार व प्रसारासाठी कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण संचालनालय (योजना विभाग) यांच्या विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलत योजनांची जनजागृती व अंमलबजावणी व्हावी यासाठी नवी मुंबई महापालिका शिक्षण विभाग अंतर्गत ११ समूह साधन केंद्रांवर मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी नुकतेच समुपदेशन वर्ग व कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.



केंद्र स्तरावर राबविण्यात आलेल्या या उपक्रमास नवी मुंबईतील सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमांतर्गत शासनाच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांना देय असलेल्या विविध योजनांवर आधारित लेखी परीक्षाही घेण्यात आल्या. या वेळी या कार्यशाळेत शिक्षकांना सर्वप्रथम पीपीटी द्वारे सर्व शासकीय योजनांची माहिती देण्यात आली तसेच तज्ञ मार्गदर्शकांद्वारे समुपदेशनही करण्यात आले.

शिक्षण संचालनालय (योजना) यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांपर्यंत प्रचार व प्रसार व्हावा यास्तव सर्वप्रथम माझ्या शिक्षकाला या योजनांची इत्यंभूत माहिती असणे गरजेचे आहे. या उदात्त हेतूनंच हा अभिनव उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांनी या वेळी दिली.

# रोह्यात ५० टक्के भातलावणी पूर्ण

## शेतकर्‍यांकडून पारंपरिक अन् यांत्रिक पद्धतीचाही वापर

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात समाधानकारक पाऊस पडल्याने शेतकर्‍यांनी पेरणी झाल्यानंतर लावणी सुरुवात झाली आहे. तालुक्यात यावर्षी ७१०० हेक्टरवर भातशेती लागवड अपेक्षित आहे. सध्या तालुक्यात भात लावणी सुरुवात झाल्यानंतर आतापर्यंत ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. तालुक्यातील खाडीपट्ट्यात मात्र भात लावणी उशिरा होणार आहे.



रोहा तालुक्यातील दुसरे महत्त्वाचे पीक असलेल्या नागलीचीही लागवड सुरू झाली आहे. या वर्षी २०० हेक्टरवर नागलीची, तर २५ हेक्टरवर वरीची लागवड अपेक्षित आहे.

तालुक्यात दरवर्षी भातशेतीचे क्षेत्र घटत असल्याचे दिसून येत आहे. युवकांचे शेतीकडे असलेली उदासीनता, वाढते औद्योगीकरण, शेतीतून मिळणारे कमी उत्पन्न यामुळे भातशेती लागवड तालुक्यात कमी होताना दिसत आहे. भातशेतीचे मूळ क्षेत्र तालुक्यात १०,८०० हेक्टर होते. ते कमी होत गेल्या वर्षी ९८५० हेक्टरवर भात लागवड झाली. या वर्षी हे क्षेत्र आणखी घटल्याचे दिसून येत असून ७१०० हेक्टरवर भात लागवड होण्याची शक्यता असल्याची माहिती तालुका कृषी विभागाकडून मिळाली आहे. नागली पिकाचे क्षेत्र दीड हजाराच्या आसपास असताना तेही घटले आहे. या वर्षी २०० हेक्टरवर नागली लागवड अपेक्षित आहे.

तालुक्यात भातलावणीचे काम वेगाने सुरू आहे. पारंपरिक पद्धतीसोबतच भात लावणी यांत्रिकी पद्धत, चारसूत्री पद्धत, एसआरटी पद्धत, ड्रम सीडर, स्त्री पद्धत आदी पद्धतीने भात लावणी करण्यात येत आहे. अद्यापही शेतकर्‍यांकडून पारंपरिक पद्धतीने भात लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. या वर्षी शेतकर्‍यांनी जया, कर्जत ९, जोरदार, रूपाली, कोमल, वायएसआर यासह अन्य जातीच्या बियाण्यांची वाण पेरणी केली आहे.

तालुक्यात भात लावणीसह अन्य लावणी जवळपास ५० टक्के पूर्ण झाली असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिली.

तालुक्यात नाचणी लागवड टोंबा पद्धतीने करण्यात येत आहे. नागली पीक विशेषता आंबिवली, पाथरशेत, वासगाव, कोंडगाव, वणी, केळघर, म्हसाडी, कोलाड आदिवासीवाडी भागात घेतले जात आहे. भात, नागली, वरी यासह भाजीपाला तूर लागवड करण्यात आली आहे.

तालुका कृषी विभागाकडून शेतकर्‍यांना या वर्षी परसबागेत लावण्यासाठी भाजीपाल्याचे २००० कीट, बांधावर तूर लावण्यासाठी ६० किलो बियाणे, भात शेतीचे कर्जत ९ वाणाचे २४०० किलो बियाणे व नाचणीचे २२० किलो बियाणे देण्यात आले असल्याचे कृषी अधिकारी महादेव करे यांनी सांगितले.

# पोलादपूर येथे खैरतस्करी पकडली; ट्रकसह माल जप्त

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वनउपज तपासणी नाक्यावर चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक ४३० खैराचे सोलीव तुकडे घेऊन जाताना जप्त करण्यात आला आहे.



रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, सहायक वनसंरक्षक विश्वजित जाधव, महाड परिक्षेत्र वनअधिकारी राकेश साहू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलादपूर वनउपज तपासणी नाका येथे मुंबई-गोवा महामार्गावरून चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक (जीजे १७-युयु ९८३७)ची तपासणी करण्यात आली. या ट्रकमध्ये खैराचे अंदाजे ६८ हजार ५७२ रुपये किमतीचे ४३० बिनपासी सोलिव तुकडे असा मुद्देमाल मिळून आला.

या प्रकरणी ट्रकचालक सिद्दिक अब्दूलरहीम वाढेल (रा. गोधरा, गुजरात) व अन्य एक इसम यांच्याविरुद्ध कारवाई करून ट्रकदेखील जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या ट्रकची किंमत अंदाजे सात लाख रुपये आहे. या कारवाईमध्ये पोलादपूर वनपाल बाजीराव पवार, तपासणी नाका वनरक्षक नवनाथ मेटकरी, वनरक्षक पोलादपूर संदीप परदेशी, तपासणी नाका पोलादपूरचे वनरक्षक सचिन मेने, निलेश नाईकवाडे, प्रियांका जाधव, अमोल रोकडे यांनी सहभाग घेतला.

# आदिवासीवाड्यांत प्रशासनाकडून लाडकी बहीण योजनेची माहिती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्यात सर्वत्र जोरदार स्वागत होत असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची आदिवासींनाही माहिती व्हावी यासाठी पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी तालुक्यातील आदिवासीवाड्यांमध्ये या योजनेसह शासनाच्या अन्य वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती देण्यासाठी दौरा केला.

पोलादपूर तहसील कार्यालयातील कर्मचारी व तलाठी तसेच मंडळ अधिकारी यांच्या उपस्थितीत हा दौरा आखण्यात आला. सर्वात आधी चोळई येथील सुंदरराव मोरे महाविद्यालयातील तरुणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती देण्यात आली. यानंतर या योजनेकरिता चांभारगणी आदिवासीवाडी, करंजे आदिवासीवाडी, साखर आदिवासीवाडी, सडवली आदिवासीवाडीतील





मार्गदर्शनावेळी पात्र महिलांना लाडकी बहीण योजनेसंदर्भात तहसीलदार घोरपडे यांनी जनतेसोबत संपर्क साधून मार्गदर्शन केले.

# बसच्या धडकेत प्रवासी जागीच ठार

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर फूडमॉलजवळ एका खासगी बसमधून प्रवासी लघुशंकेसाठी उतरून बसच्या पाठीमागे गेला असताना तिथे असणार्‍या शिवनेरी बसने रिव्हर्स घेतल्याने प्रवाशाला जोरदार धडक बसली. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी (दि. ६) रात्री १.३०च्या सुमारास घडला.

मन्सूर बोहरी असे मयत प्रवाशाचे नाव असून ते आपल्या गावी जात असताना बस खालापूर टोलनाक्याजवळील राज ढाबा येथील पार्किंगमध्ये आली. त्या वेळी बोहरी हे लघुशंकेसाठी शिवनेरी बसच्या शेजारून जात असताना या चालकाने बस रिव्हर्स घेतल्याने जोरात धक्का बोहरी यांना लागला. त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच महामार्गावरील सुरक्षा यंत्रणानी धाव घेत पुढील कार्यवाही केली.

# पोलादपूर एसटी बस अपघातप्रकरणी चालकावर गुन्हा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कुडपण येथून प्रवासी व विद्यार्थी घेऊन निघालेली एसटी बस क्षेत्रपाळ गावच्या हद्दीत खड्ड्यामध्ये आदळली. या अपघातात सात विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. या वेळी सोशल मीडियाद्वारे अनेकांनी बसचालकावर कारवाईची मागणी केल्यानुसार पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुडपण येथून गुरूवारी सकाळी १०च्या सुमारास पोलादपूरच्या दिशेने निघालेली बस (एमएच २०-बीएल ३७७५) चालक उद्धव रामचंद्र नलावडे चालवत होते. या वेळी बसमध्ये विद्यार्थी आणि प्रवासी असे एकूण ३० जण प्रवास करीत होते. यातील गोळेगणी हायस्कूलची इयत्ता दहावीमधील विद्यार्थिनी रूपाली गंगाराम सोनावणे व वंदना पांडुरंग ढेबे, परसुले प्राथमिक शाळेतील पाचवीतील विद्यार्थिनी प्रतीक्षा संदीप मोरे, सातवीतील विद्यार्थी सोहम मंगेश मोरे, चौथीतील विद्यार्थी संतोष गंगाराम खुटेकर, करण भिवाजी सावंत, सातवीतील विद्यार्थिनी सायली संदीप मोरे, वैदेही लक्ष्मण खुटेकर, श्रेया सतीश मोरे आदी जखमी झाले.




जखमींना तात्काळ ग्रामीण रुग्णालय पोलादपूर येथे दाखल करण्यात येऊन उपचार सुरू करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक निरीक्षक जीवन माने यांच्यासह स्वप्नील कदम, परेश मोरे, सुतार, संग्राम बामणे आदी पोलीस कर्मचार्‍यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली.

या वेळी गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, प्राथमिक शाळांचे केंद्रप्रमुख मारुती कळंबे, कुडपणचे सरपंच अजय चिकणे यांनी पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात जखमींची भेट घेत विचारपूस केली आणि या अपघातातील एसटी बसचालक उद्धव नलावडे याच्याविरोधात कायदेशीर कारवाईची मागणी केली.

अखेर बसचालक नलावडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सोशल मीडियातूनच प्रसारित करण्यात आली असल्याने या अपघातप्रकरणी सोशल मीडिया प्रभावी ठरल्याचे चित्र तालुक्यात दिसून आले आहे.

# मुरुडमधील कोंड आंबोली येथे मोरीचे लोकार्पण

## ■ विकासकामे करणार्‍या पक्षासोबत रहा -दिलीप भोईर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील कोंड आंबोली गावात पावसाचे पाणी वाहून नेणारी मोरी गेल्या अनेक दिवसांपासून पडीक व जीर्ण अवस्थेत होती. भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष व माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर हे एका कार्यक्रमासाठी आले असता त्यांनी या मोरीची अवस्था पाहून ग्रामस्थांनाही मोरी नव्या स्वरूपात बांधण्यासाठी स्वतःचे आर्थिक योगदान देऊन काम पूर्ण करून घेतले. याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे ऋण व्यक्त करीत या मोरीचा लोकार्पण सोहळा त्यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.



या कार्यक्रमास भाजपचे तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, सरचिटणीस नरेश वारगे, बाळा भगत, महेंद्र चौलकर, माजी सरपंच नरेंद्र म्हात्रे, गाव अध्यक्ष नितीन गुंड, आप्पा पालकर, प्रवीण बैकर, सुदाम वाघिलकर, आदिनाथ सानेकर, हरीश आरकशी, राजेश पाटील, संजय म्हात्रे यांच्यासह या वेळी कोंड आंबोली गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना भाजप नेते दिलीप भोईर म्हणाले की, गावाचा विकास जो पक्ष करेल त्याच पक्षसोबत ग्रामस्थांनी राहणे आवश्यक आहे. केंद्रात व राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता असून कोणतेही गाव विकास कामापासून वंचित राहणार नाही. भाजपने लोकहिताच्या कामास प्रथम प्राधान्य दिले आहे. यापुढेही जनतेची कामे केली जातील.

# सामान्य लोकांमधील असामान्य नेता ॲड. राजीव साबळे

रायगड जिल्ह्यातील माणगाव येथील लोकनेते माजी आमदार स्वर्गीय अशोकदादा साबळे यांचे ज्येष्ठ सुपुत्र रायगड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांचा आज (७ जुलै) वाढदिवस. त्यांना सुरुवातीलाच तमाम माणगावकरांतर्फे वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

स्व. लोकनेते माजी आमदार अशोकदादा साबळे यांनी आपल्या आयुष्यात सामाजिक बांधिलकी ओळखून हिरीरिने सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देत काम केले. आजही त्यांची आठवण माणगावकर आवर्जून काढताना दिसतात. त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे पुत्र ॲड. राजीव साबळे हे समाजात उत्तम प्रकारे काम करीत आहेत. त्यांनी जॉली क्लब संचालित सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचे संस्थापक म्हणून अनेक वर्षे काम पाहिले आहे. त्यांच्या नेतृत्वखाली २५ वर्षे गणेशोत्सव माणगावात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ॲड. साबळे यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार , सांस्कृतिक, कला व क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान आहे.



ॲड. साबळे हे आपल्या वडिलांप्रमाणे राजकरणात सक्रीय झाले. राजकारणाच्या माध्यमातून समाजकारणाचे व्रत त्यांनी जोपासून ८० टक्के समाजकारण व फक्त २० टक्के राजकारण या पद्धतीने बहुजन समाजात ते बंधू-भगिनींना सेवा देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत. ॲड. साबळे हे माणगाव जिल्हा परिषद गटातून सलग दोन वेळा, लाखपाले जिल्हा परिषद गटातून एक वेळा, तर लोणेरे जिल्हा परिषद गटातून एक वेळा असे चार वेळा जिल्हा परिषदेवर निवडून गेले आहेत. रायगड जिल्हा परिषदेचे प्रतोद, विरोधी पक्षनेता, शिक्षण व आरोग्य सभापती म्हणून त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांना प्रशासकीय ज्ञान उत्तम प्रकारे असल्याने जिल्हा परिषद सभागृहात स्थायी समितीच्या सभांमध्ये त्यांनी अभ्यासपूर्ण शैलीने समाजाचे विविध प्रश्न, समस्या मांडून आपल्या कारकिर्दीत सोडविले आहेत. जि.प.चे एक डॅशिंग सदस्य म्हणून त्या काळात त्यांच्याकडे पहिले जात होते.

ॲड. राजीव साबळे यांनी माणगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची चांगली दालने तयार केली आहेत. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून गेली अनेक वर्षे ते काम करीत आहेत. या मंडळातर्फे माणगाव द.ग.तटकरे वरिष्ठ महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, अशोकदादा साबळे विद्यालय, सुधाकर नारायण शिपूरकर पूर्व प्राथमिक व प्राथमिक इंग्रजी शाळा, गणेशशेठ यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळा व मातोश्री गंगुबाई शिंदे सिबीएससी अभ्यासक्रम स्कूल सुरू आहेत. दक्षिण रायगडातील विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन त्यांनी माणगावात विधी महाविद्यालय सुरू केले आहे. द.ग. तटकरे महाविद्यालयात विविध शैक्षणिक दालने आहेत. नुकतेच ॲड. साबळे यांच्या प्रयत्नांनी माणगावला नर्सिंग कॉलेज मंजूर झाले आहे. हे शिक्षणप्रेमी व्यक्तिमत्व आहे. आपल्या भागातील विद्यार्थ्यांना मुंबई-पुणेसारख्या धर्तीवर चांगले शिक्षण मिळून विद्यार्थी चांगले घडावेत यासाठी त्यांचे विशेष प्रयत्न आहेत.

ॲड. राजीव साबळे यांनी सन २०२१च्या माणगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीत आपल्या सहकारी मित्रांच्या व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने शिवसेनेचा भगवा फडकावून आपले पिताश्री स्व. लोकनेते माजी आमदार अशोकदादा साबळे यांचे स्वप्न साकार केले. येणार्‍या काळात माणगाव नगरीचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

माणगावच्या विकासासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या या सामाजिक, राजकीय, सहकार व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल माणगाव तालुका पत्रकार संघाने घेत ५ सप्टेंबर २०१८ रोजी शिक्षक दिनी द.ग.तटकरे महाविद्यालयातील सभागृहात त्यांना शिक्षण क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले होते. समाजात ते बांधिलकी राखून काम करीत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त माणगावात वृक्ष लागवड व महारक्तदान शिबिर अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रोप लागवडीचा कार्यक्रम १ जुलैपासून हाती घेण्यात आला असून पाच हजार विविध प्रकारचे रोपांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला असून ७ जुलै रोजी द.ग. तटकरे महाविद्यालय येथे सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार्‍या रक्तदान शिबिरात किमान ५०० बॅगा रक्त संकलित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

आमचे मार्गदर्शक रायगड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती तथा माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांना ईश्वराने दीर्घायुष्य देवो हीच त्यांना वाढदिवसानिमित्त तमाम माणगावकरांतर्फे हार्दिक शुभेच्छा!

**-नितीन विष्णू बामगुडे,**
**माजी नगरसेवक, माणगाव**

# रिलायन्स कंपनी सोसायटीच्या निवडणुकीत राजेंद्र लवटे विजयी

**नागोठणे : बातमीदार**

आशिया खंडातील सर्वांत मोठी असलेली रिलायन्स पेट्रोल केमिकल लि. नागोठणे या कंपनीच्या नुकत्याच घेण्यात आलेल्या क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत क्रियाशील कामगार पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा भारतीय जनता पक्षाचे पंचायत समिती गण अध्यक्ष राजेंद्र तुकाराम लवटे यांचा दणदणीत विजय झाला. याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राजेंद्र लवटे यांचा विजय झाल्यानंतर आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार व भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, पेण विधानसभा अध्यक्ष प्रसाद भोईर, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, महिला उपाध्यक्ष श्रेया कुंटे, पिगोंडे सरपंच संतोष कोळी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, कामगार नेते संजय काकडे, भाजप रोहा तालुका सरचिटणीस आनंदी लाड, वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य एकनाथ ठाकूर, कामगार नेते साधुराम मालुसरे, दीपक रानवडे, विजय चवरकर, दयाराम पाटील, दापोलकर, शेळके, विकास खांडेकर आदींसह सर्व युनियनचे पदाधिकारी, वेलशेत व आंबेघर ग्रामस्थ, मित्रमंडळी व विविध पक्षातील राजकीय नेतेगण यांनी प्रत्यक्ष भेटून तसेच फोनवर अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# सर्वे शाळेला टीव्ही भेट




**रेवदंडा : प्रतिनिधी**

काशिद ग्रामपंचायतीच्या सहकार्याने तसेच अलिबाग रोटरी क्लब सी शोअरचे अध्यक्ष डॉ. निलेश म्हात्रे यांच्या सौजन्याने सर्वे राजिप शाळा येथे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणासाठी अ‍ॅण्ड्रॉईड स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला.

मुरूड तालुक्यातील सर्वे शाळा विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणासाठी सर्वे येथील सुशिल खोपकर, संतोष सावंत, अध्यक्ष विजय कांगणे, उपाध्यक्ष शैलेश जाधव, जेष्ठ सदस्य नरेश धार्वे, हरिश्चंद्र कांगणे, राहुल महाडिक, उमेश कदम या सर्वांनी व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी अ‍ॅण्ड्रॉईड स्मार्ट टीव्ही काशिद ग्रामपंचायतीच्या सहकार्याने तसेच अलिबाग रोटरी क्लब सी शोअरचे अध्यक्ष डॉ. निलेश म्हात्रे यांच्या वतीने मिळवून दिले.

याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, उपशिक्षक सूर्यकांत पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# युरो कपमध्ये थरारक लढती

## यजमान जर्मनीला हरवून स्पेनची उपांत्य फेरीत धडक



**श्टुटगार्ट : वृत्तसंस्था**

स्पेनने युरो कपच्या फुटबॉल सामन्यात यजमान जर्मनीला २-१ने हरवत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. स्पेन आणि जर्मनी यांच्यात रोमहर्षक सामना झाला. या सामन्यात दोन्ही संघांनी १-१ अशी बरोबरी साधली होती. सामना पेनल्टी शूटआऊटच्या दिशेने वाटचाल करीत होता, परंतु मायकल मेरिनोने ११९व्या मिनिटाला गोल केला. त्यामुळे स्पेनने शानदार विजय मिळवत सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे.

मेरिनोने गोल केल्यानंतर लोकांची जुनी आठवण जागृत झाली. त्याचे वडील मिगुएल मेरिनो यांनीही १९९१मध्ये यूएफा कपमध्ये याच मैदानात गोल केला होता. ती आठवण सोशल मीडियावर अनेकांनी शेअर केली आहे. मायकल मेरिनोच्या विजयी गोलमुळे हा सामना स्पेनच्या खिशात गेला. त्याला साथ देणाऱ्या डेनी ओल्मोने सेकंड हाफमध्ये गोल करून स्पेनला विजयाच्या दिशेने नेले होते. आता स्पेनचा सामना सेमी फायनलमध्ये फ्रान्सशी होणार आहे. फ्रान्सने पोर्तुगालचा पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव केला आहे.

> **मला माहीत होते की, वेळ कमी उरला आहे. आमच्या विरोधात प्रतिस्पर्धी संघ रणनीती करून आम्हाला रोखू शकतो याचीही कल्पना मला होती. तरीही मी निग्रह करीत गोल केला. तो झाल्यानंतर काही सेकंदांसाठी मलाही विश्वास बसला नाही की मी गोल केला. मी माझ्या टीमसाठी खेळलो यासाठीही मी खूप खुश आहे.**
> **–मायकल मेरिनो**

## फ्रान्सकडून पोर्तुगाल पराभूत; रोनाल्डोचे स्वप्न भंगले!

**हॅम्बर्ग : वृत्तसंस्था**

फुटबॉल जगतातील नामवंत खेळाडू आणि पोर्तुगालचा आधारस्तंभ असलेल्या ख्रिस्तियानो रोनाल्डोला आपल्या शेवटच्या युरो चषकात संघाला यश मिळवून देता आलेले नाही. फ्रान्सविरुद्ध झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत पोर्तुगालचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ५-३ने पराभव झाला.

जर्मनीच्या हॅम्बर्ग शहरातील फोक्सपार्क स्टेडियम मैदानात पोर्तुगाल विरुद्ध फ्रान्स हा बहुचर्चित सामना पार पडला. निर्धारीत वेळेत दोन्ही संघाना एकही गोल करता आला नाही. त्यामुळे पेनल्टी शूटआऊट करून सामन्याचा निकाल जाहीर झाला. पोर्तुगालकडून तीन गोल करण्यात आले, मात्र बाकीचे खेळाडू गोलकिपरला भेदण्यात अपयशी ठरले. फ्रान्सचा गोलकिपर मॅगननने तीनवेळा मोठ्या चपळाईने गोल रोखला.

या सामन्याला युरो २०१६ चषकाच्या अंतिम सामन्याची पार्श्वभूमी होती. २०१६ रोजी पोर्तुगालने फ्रान्सला अंतिम सामन्यात एका गोलने नमवले होते. त्या पराभवाची परतफेड आता किलियन एम्बापेच्या नेतृत्वाखाली फ्रान्सने केली आहे.






## हार्दिकसाठी भाऊ कृणालची भावूक पोस्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेचा किताब जिंकून भारतीय संघाने तमाम भारतीयांची इच्छा पूर्ण केली. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा सात धावांनी पराभव करून भारताने जग जिंकले. भारताच्या या विजयात अष्टपैलू हार्दिक पांड्याचे मोठे योगदान आहे. खरेतर मागील काही कालावधीपासून हार्दिकला ट्रोलर्सचा सामना करावा लागला. याचाच दाखला देत त्याचा भाऊ कृणाल पांड्याने एक लांबलचक पोस्ट लिहिली आहे.

अंतिम सामन्यात पांड्याने घातक वाटणाऱ्या हेनरिक क्लासेनला बाद करून भारतीय चाहत्यांना सुखद धक्का दिला तसेच अखेरच्या षटकांत १६ धावांचा बचाव करताना पांड्याने डेव्हिड मिलर आणि कगिसो रबाडा यांना बाद केले. कृणाल पांड्याने पोस्टच्या माध्यमातून म्हटले की, हार्दिक आणि मी व्यावसायिक क्रिकेट खेळायला सुरुवात करून जवळपास एक दशक पूर्ण झाले आहे. मागील काही दिवस एखाद्या स्टोरीसारखे होते, ज्याचे आपण स्वप्न पाहिले होते ते अखेर सत्यात उतरले आहे. प्रत्येक देशवासीयांप्रमाणे मीदेखील या क्षणाचा आनंद घेत आहे. मी माझ्या भावाकडे पाहून खूप भावूक झालो आहे. हार्दिकसाठी गेले सहा महिने सर्वात कठीण गेले आहेत. त्याच्यासोबत खूप वाईट झाले. तो केवळ याच्यासाठी पात्र नव्हता हे मला कळते. म्हणूनच एक भाऊ म्हणून मला त्याच्यासाठी खूप वाईट वाटले. त्याने या काळात खूप काही सहन केले. शेवटी तोदेखील एक माणूस आहे. त्यालाही भावना आहेत.

हार्दिक कसा तरी हसत हसत या सगळ्यातून बाहेर पडला, तरीही मला माहीत आहे की, त्याला हसणे किती कठीण होते. तो कठोर परिश्रम करीत राहिला आणि विश्वचषक मिळविण्यासाठी त्याला काय करावे लागेल यावर लक्ष केंद्रित केले, कारण ते त्याचे अंतिम उद्दिष्ट होते. भारताचे दीर्घकाळचे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने खूप चांगली कामगिरी केली. त्याच्यासाठी यापेक्षा मोठे काहीच नाही. वयाच्या सहाव्या वर्षापासून देशासाठी खेळणे आणि विश्वचषक जिंकणे हे स्वप्न होते, असेही कृणालने पोस्टच्या माध्यमातून म्हटले आहे.

मी फक्त लोकांना आठवण करून देऊ इच्छितो की हार्दिकने त्याच्या कारकिर्दीत इतक्या कमी कालावधीत जे केले ते अविश्वसनीय आहे. राष्ट्रीय संघासाठी त्याने खूप काही केले. माय बच्चू, मला तुझ्याबद्दल खूप आदर आहे, अशा शब्दांत कृणालने नमूद केले.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com